## राजपथावर महाराष्ट्राचा डंका



**नवी दिल्ली :** प्रजासत्ताक दिनानिमित्त राजपथावरील झालेल्या दिल्लीत झालेल्या परेडमध्ये 'पॉप्युलर चॉईस' प्रकारात महाराष्ट्राच्या चित्ररथाचा प्रथम क्रमांक आला आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील राजपथावर महाराष्ट्रातील जैवविविधतेवर आधारित चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जैवविविधतेचे दर्शन संपूर्ण भारतवासीयांना घडून आले.


# कृषीवल

रायगड ॥ शनिवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹



अलिबाग येथील खडतालपूल जवळ अलिबाग-रेवस रोडला लागून सुमारे अडीच गुंठे सेप्रेट सातबारा असलेली जागा विकणे आहे.

संपर्क- ७७६८८६८०००


## महत्त्वाचे

### बंडातात्यांना अटक

**मुंबई :** ज्येष्ठ कीर्तनकार बंडातात्या कराडकर यांना सातारा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बंडातात्या कराडकर यांनी साताऱ्यात सुपरमार्केटमध्ये वाइन विक्री करण्याच्या निर्णयाविरोधात आंदोलन करताना राजकीय नेत्यासंबंधी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे त्यांच्याविरोधात मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करण्यात येत होता. यावेळी कराडकर यांनी राज्यातील नेते आणि त्यांची मुले रस्त्यावर दारू पिऊन पडत असतात आणि याचे पुरावेदेखील असल्याचे प्रसारमाध्यमांशी म्हटले होते.

### 'नीट' परीक्षा पुढे

**नवी दिल्ली :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने 'नीट' परीक्षा २०२२ सहा ते आठ आठवड्यांनी पुढे ढकलली आहे. याआधी ही परीक्षा १२ मार्च रोजी होणार होती. आता ती परीक्षा मे-जून मध्ये होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या शिवाय परीक्षेच्या नव्या तारखांची घोषणा देखील लवकरच होऊ शकते. विद्यार्थ्यांशी संबंधित कारणांमुळे मे-जून २०२२ मध्ये परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'नीट पीजी'२०२२ परीक्षा स्थगित करण्याची मागणी थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचली होती. यात राष्ट्रीय परीक्षा बोर्ड, एनबीई द्वारे आयोजित नीट पीजी परीक्षा स्थगित करण्याची मागणी करण्यात आली होती.

# आशाताईंची सरकारकडून निराशा

*। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।*

*कोरोना विरोधातील लढाईत मोठा सहभाग असणाऱ्या आशा सेविकांचे मागील तीन महिन्यांपासूनचे मानधन रखडल्याने जिल्ह्यातील आशा सेविकांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचे मानधन अजूनही मिळालेले नसल्याने आशा सेविकांमध्ये नाराजी पसरली आहे. सॉफ्टवेअरमुळे सदर मानधन रखडले असल्याचे सांगण्यात येते. आधीच अत्यल्प असलेले मानधन, तेही जर तीन-तीन महिने मिळत नसेल तर आशा सेविकांनी जगायचे कसे, असा प्रश्न त्यांना सतावत आहे.*



संग्रहित छायाचित्र

**कार्यरत आशा सेविका**
**96 अलिबाग तालुका**
**2,300 संपूर्ण जिल्ह्यात**

**॥ तीन महिन्यांपासून मानधन रखडले**

**॥ अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ**

आशा सेविका म्हणून काम करणाऱ्या महिलांमध्ये अनेकजणांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. काही विधवा, परित्यक्ता अशा महिलादेखील आशा सेविकेचे कर्तव्य बजावत आहेत. डॉक्टरदेखील कोरोना काळात रुग्णांजवळ जाण्यास तयार नव्हते, त्यावेळी आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका आघाडीवर जाऊन गावोगावी कोरोनाचे सर्व्हेक्षणाचे काम करत होते. कोरोना निर्मूलनात आशा सेविकांचे मोठे योगदान आहे. हेच काम करताना अलिबाग तालुक्यातील एका आशा सेविकाला आपला जीवदेखील गमवावा लागला आहे. त्यांना या कामाच्या बदल्यात अत्यंत तुटपुंजे मानधन शासनाकडून दिले जाते. मात्र, तेही वेळेवर मिळत नसल्याने मोठ्या वाईट परिस्थितीला सामोरे जावे लागते. अलिबाग तालुक्यात ९६ आशा सेविका कार्यरत आहेत. तर संपूर्ण जिल्ह्यात २ हजार ३०० आशा सेविका आपले कर्तव्य बजावत असतात. कोरोनाच्या सोबतच सर्व लसीकरण, पान २ वर

### आरोग्याच्या दूत दुर्लक्षित

**ग्रामीण भागातील आरोग्याच्या दूत म्हणून त्या कार्यरत आहेत. अशा वेळी ग्रँण्ड नाही, सॉफ्टवेअरची समस्या अशा कारणांमुळे वारंवार त्यांना उशिराने मानधन मिळत असते. तरीदेखील आशाताई मोठ्या इमानेइतबारे आपली सेवा देत असतात. सर्व्हेक्षणाबरोबरच प्राथमिक आरोग्य केंद्रातदेखील त्यांना काम करावे लागते. प्रत्येक घरोघरी भेटी देऊन सर्व्हेक्षण करावे लागते. मात्र, काम करुन देखील वेळेवर मानधन मिळणार नसेल तर काय करणार, असा प्रश्न आशाताईंना पडला आहे.**

# पूरसमस्येबाबत महाडकर आक्रमक



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून येणाऱ्या पुरावर शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत दिरंगाई केली जात असल्याने, महाडकर नागरिक अखेर आक्रमक झाले. शनिवारी सकाळी नागरिकांच्या वतीने येथील प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

**॥ प्रांत कार्यालयावर सर्वपक्षीय मोर्चा**

**॥ बाजारपेठेत कडकडीत बंद**

महाड शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पान २ वर



■ अलिबागच्या कुलाबा किल्ल्यात माघी गणेशोत्सवानिमित्त दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

■ जिल्ह्यातील संबंधित वृत्त पान ३ वर

## नितेश राणेंचा मुक्काम वाढला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



नितेश राणे यांना आजही दिलासा मिळाला नाही, त्यामुळे नितेश यांना १८ फेब्रुवारीपर्यंत कोठडीत राहावं लागणार आहे. नितेश यांची दोन दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्यांना सिंधुदुर्ग न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी कोर्टात कोठडीवर सुनावणी झाल्या नंतर हा निर्णय दिला. पान २ वर

## एसटी बंदमुळे डेपोतील व्यावसायिकांवर उपासमारी

**नेहा कवळे**

**। अलिबाग ।**

'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीद वाक्य घेऊन धावणारी लालपरी सर्वसामान्यांसाठी जिव्हाळ्याची आहे. मात्र, राज्य परिवहन मंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करावे यासाठी पुकारलेल्या आंदोलनास रायगडातील डेपोमधून पाठिंबा देण्यात आला. पान २ वर



**“ बसमध्ये फळे विकून चार पैसे मिळतात. त्यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. परंतु, एसटीच्या संपामुळे माझा व्यवसाय मागील अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.**

**- आशा पाटील, फळविक्रेती**

### रिक्षाचालकांचा व्यवसाय ठप्प

**अलिबाग डेपोमध्ये उतरणाऱ्या प्रवाशांना विविध ठिकाणी पोहोचविणाऱ्या बसस्थानक परिसरातील रिक्षाचालकांचा व्यवसायही ठप्प झाला आहे. पहिल्या दिवसभरात सात ते आठ वेळा नंबर येत असे. आता एसटी संपामुळे प्रवासी नसल्यामुळे दिवसभरात कधी दोन ते तीन वेळाच नंबर येतो.**

उद्याच्या अंकात : संपाचा विद्यार्थी, प्रवाशांवर परिणाम


www.pateljewellers.com

पटेल ज्वेलर्स

" चोख सोने योग्य भाव "

पटेल ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये एकच किंमत असेल व ती इतर सर्व ब्रॅण्डच्या मानाने " कमीत कमी व योग्य किंमत " असेल

बार्गेनिंगची गरजच नाही
आता सोने खरेदी झाली अधिक सोपी
" पटेल ज्वेलर्स का सही प्राईस "

PSP
Patel Jewellers Ka SAHI Price

“ योग्य किंमत ”

Fix Rate

Get 50% Benefit On Making charges

More than 50,000 designs with 7 branches

More than 10 lakh loyal customers

BIS - 916 100% Hallmarked

Lowest making with 916 purity

SUNDAY OPEN

महाराष्ट्र : पनवेल-3, पेण, उरण गुजरात : मेहसाना, मोडासा Ph - 022 - 27491000 TOLL FREE 1800 121 1090

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**५ फेब्रुवारी**

१) श्रीम. मेघना मनोहर जोशी
श्रीबाग-२, गणेश मंदिराशेजारी,
चेंढरे-अलिबाग,
५ फेब्रुवारी १९४८
२) विनायक कुंठे श्रीमती शुभदा
कुंठ्याची गोठी, पो.बामणगाव
५ फेब्रुवारी १९५१

## म ह त्त्वा चे

### श्रीवर्धनमध्ये माघी गणेशोत्सव

**| दिघी | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये सर्वत्र माघी गणेशोत्सव भक्तीमय वातावरणात, मोठ्या उत्साहात पार साजरा करण्यात आला. तालुक्यातील बोर्लीपंचयतन, शिस्ते, दिवेआगर या प्रसिद्ध गणेश मंदिरात कोरोना नियमांचे पालन करत भाविकांना आपल्या लाडक्या मोरयाचे दर्शन घेतले.

### डॉ. आशिष जैन यांची निवड

**| मुंबई | प्रतिनिधी |**

अखिल भारतीय फार्मासिस्ट असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य मुंबई विभागाची कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यात आले असून, या मंडळाच्या सल्लागारपदी डी.डी.विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी ॲन्ड रिसर्च सेंटर, पनवेल येथील प्राचार्य डॉ. आशिष जैन यांची निवड करण्यात आली आहे.

फार्मासिस्टवर होणारा अन्याय दूर सारुन त्यांच्या न्यायहक्कासाठी कार्य करणारे डॉ. जैन यांनी कोरोना काळात सामाजिक बांधिलकी जपत आपले कर्तव्य पार पाडले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता खराटे, उपाध्यक्ष डॉ.पंकज चौधरी, सचिव रोहित वाघ, मुंबई विभाग अध्यक्ष तथा राज्य कार्यकारीणी सदस्य प्रा. हर्षराज अहिरे यांच्या शिफारशीनंतर एकमताने ही निवड करण्यात आली आहे.

### पेण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**| पेण | वार्ताहर |**

सह्याद्री प्रतिष्ठान, पेणच्या माध्यमातून दि. ६ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोरोना काळात तीन वेळा रक्तदान शिबीर आयोजित करुन प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित शिबिरात ५०० बाटल्या रक्तसंकलन करण्याचा संकल्प सह्याद्रीच्या मावळ्यांनी केला आहे. सर्व संघटना व मित्र मंडळी तसेच काही नवीन शिवप्रेमी संघटना, भजनी मंडळ, कबड्डी संघटना, क्रिकेट संघटना यांनी सर्वांनी एकत्र येउन रक्तदान करण्याचे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले आहे. हे शिबीर सकाळी ८ ते दुपारी ३ दरम्यान गांधी वाचनालय, पेण येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे महाराष्ट्र उपाध्यक्ष समीर म्हात्रे यांनी दिली.

# शेकडो हेक्टर जमीन खाऱ्यापाण्याखाली

## शेतकऱ्यांना फटका; प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष

**| पेण | वार्ताहर |**



काळेश्री गावाच्या हद्दीत प्रथमेश काकडे कंपनीचा वर्ल्ड बँकेच्या मदतीने खारबंदिस्तीचे काम सुरु आहे. परंतु, हे काम निकृष्ट दर्जाचे तर आहेच, त्याचप्रमाणे नियोजनबद्ध नाही. काळेश्री गावच्या शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसला आहे.

काळेश्री गावच्या हद्दीत उघाडी क्रमांक एकचे काम सुरु असून, ते काम करीत असताना उघाडीचे रिंग बांध चुकीच्या पद्धतीने घातला असल्याने, तो उधानाच्या पाण्याने फुटला असून, खारेपाणी शेकडो एकर जमिनीमध्ये घुसून जमीन नापीक होणाच्या मार्गावर आहे.

याबाबत प्रांत कार्यालयासोबत ग्रामपंचायत काळेश्रीने लेखी पत्रव्यवहार केला असून, प्रांत कार्यालयाकडूनदेखील ठोस पावले उचलली जात नसल्याचा संताप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे सद्यःस्थितीत काळेश्री गावच्या हद्दीतील जमीन खाऱ्यापाण्यात बुडाली असून, वेळेवर जर पाणी निघाले नाही, तर पूर्ण काळेश्री खलाटी नापीक झाल्याशिवाय राहणार नाही.

या खारबंदिस्तीच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी उपअभियंता मिठारी यांची नेमणूक केली आहे. परंतु, हे अधिकारी ठेकेदाराचे हस्तक असल्याप्रमाणे वागून शेतकऱ्यांवर अन्याय करत आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनीत गेलेल्या खाऱ्यापाण्याची जबाबदारी ज्याप्रमाणे ठेकेदाराची आहे, त्याचप्रमाणे अधिकारी वर्गाचीदेखील आहे. मात्र, अधिकारी याबाबीकडे दुर्लक्ष करत आहेत, म्हणून ग्रामपंचायत काळेश्रीचे सर्व सदस्य खारजमीन विकासमंत्री विजय वडेट्टीवार यांच्याकडे कैफीयत मांडणार असल्याची माहिती काळेश्री उपसरपंच संजय पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

# आज तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**| अलिबाग | शहर वार्ताहर |**

भारत सरकार अंतर्गत युवा कार्यक्रम तथा क्रीडा मंत्रालय संचालित नेहरु युवा केंद्र, रायगड-अलिबाग, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा आणि प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्या विशेष संयोजनाने शनिवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी अलिबाग येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे या स्पर्धा ठीक सकाळी ८ वाजता सुरु होणार असून, मुलींसाठी १०० मीटर, ८०० मीटर, ३ कि.मी. धावणे तर मुलांसाठी १६०० मीटर, ५ कि.मी. धावणे, गोळा फेक, लांब उडी, व्हॉलीबॉल या क्रीडाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

खुला गटात आयोजित या स्पर्धा कार्यक्रमात कोरोना प्रतिबंधात्मक लसीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या नागरिकांनाच प्रवेश घेता येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. तरी या स्पर्धेत अधिकाधिक सहभाग नोंदविण्याचे आवाहन नेहरु युवा केंद्र संघटन, रायगड-अलिबागचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला यांनी केले आहे.

# मतदान जागृतीसाठी विविध स्पर्धात्मक कार्यक्रम

## स्नेहा उबाळे यांच्या मार्गदर्शनांतर्गत प्रिझमचा उपक्रम

**| अलिबाग | शहर वार्ताहर |**



जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग तथा प्रिझम सामजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने निवडणूक विभाग उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनांतर्गत मतदार जागृतीसाठी विविध स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपूर्ण निवडणुका या ध्येयवाक्यांतर्गत निबंध, वक्तृत्व, पोस्टर्स मेकिंग, स्लोगन मेकिंग अशा विविध स्पर्धा स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा संचालित स्पर्धा विश्व अकॅडमीच्या अलिबाग मुख्य अभ्यासिकेत संपन्न झाल्या.

या स्पर्धांमध्ये अकॅडमीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, या स्पर्धांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या निकालानुसार वक्तृत्व स्पर्धेत सृष्टी कांबळी, प्रसाद अमृते आणि अमृता शेडगे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे यश संपादित केले आहे.निबंध स्पर्धेचा निकाल प्रथम क्रमांक निशा भगत, द्वितीय क्रमांक विभागून- निशिता पाटील आणि प्रसाद अमृते आणि तृतीय क्रमांक-साक्षी पाटीलने पटकाविला.

स्लोगन मेकिंग स्पर्धेत सोनाली वाघरे हिने प्रथम, मनस्वी महेश म्हात्रे हिने द्वितीय तर नेहा हेमंत म्हात्रे हिने तृतीय क्रमांक असे यश मिळविले आहे. तर, पोस्टर्स मेकिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक- मनस्वी म्हात्रे, द्वितीय- नेहा म्हात्रे आणि तृतीय क्रमांक - मनाली पाटील असे यश मिळविले आहे.

स्पर्धेतील सर्व विजेत्यांना जिल्हा निवडणूक विभागाच्या वतीने नियोजित पारितोषकांचे वितरण करण्यात आले असून, स्पर्धांच्या यशस्वीततेसाठी निवासी नायब तहसीलदार साळवी, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तथा मतदार डिस्ट्रीक युथ आयकॉन तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी यांनी परिश्रम घेतले.

# श्रीवर्धनमध्ये पांढऱ्या गरुडाला जीवदान

**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

येथे पर्यावरण मित्र यांच्या सतर्कतेमुळे दुर्मिळ अशा विदेशी प्रजातीमधील पांढऱ्या गरुडाला जीवदान मिळाले आहे.

अन्य पशुपक्ष्यांकडून या पक्षाला घायाळ करण्यात आले असल्याने, ते मरणन्मुख अवस्थेकडे पोहचले होते. या पक्षावर प्रथमोपचार करत पर्यावरण मित्र शैलेश ठाकूर, सचिन शिंदे यांनी सिस्केप संघटनेचे सदस्य बाळा वाणी यांच्या मदतीने श्रीवर्धन येथील वनविभागाकडे स्वाधीन केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मौजे वावंजे, मौजे घोट (घोट चाळ) तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील मिळकतीबाबत हरकतीची जाहीर नोटीस.

आमचे अशिल गजानन भबला माळी, बाळाराम अर्जुन माळी, मंगलदास गोपाळ माळी, सुशिल अनंता माळी, वगैरे यांच्यातर्फे खालील मिळकतीबाबत पनवेल येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.१३१/२०२० श्री किसन सीताराम माळी, वामन कुंडलिक माळी, बुधाजी नारायण माळी, संदीप बाळाराम माळी, सुभाष नामदेव माळी वगैरे यांचे विरूध्द दाखल आहे. खालील मिळकती या दाव्यातील काही प्रतिवादी यांनी विक्रीस काढल्याचे समजते त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**एकत्र कुटूंब प्रमुख म्हणून वामन कुंडलिक माळी याचे भोगवटाधारक असलेल्या मिळकतीः-**

| | मौजे | गट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | वावंजे(कोल्हेभुक) | ११५/१ | ०-६७-५० |
| २ | वावंजे (कोल्हेभुक) | ११६/१ | १-७४-५ |
| ३ | वावंजे(कोल्हेभुक) | ११८/० | ३-०७-० |

एक कुटूंब पुढारी म्हणून कै.जोमा महादू माळी यांचे नातू कै.बाळाराम नारायण माळी संदीप, शैलेश, पंकज बाळाराम माळी श्वेता उर्फ स्वाती हरेश दमडे वगैरे

| | मौजे | गट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | वावंजे | ११५/२ | १-९१-१ |
| २ | वावंजे(कोल्हेभुक) | ११४ | १-५०-७ |
| ३ | वावंजे | ११५/२ब | १-५५-३ |
| ४ | वावंजे | ११२/१ | १-५८-१ |
| ५ | वावंजे | ११६/२ब | २-७४-५ |

**श्री.बुधाजी नारायण माळी, श्री.पांडूरंग नारायण माळी, सौ.अंजली नारायण माळी, संदीप बाळाराम माळी, वगैरे सौ.सखुबाई मारूती पाटील, श्री.हरिश्चंद्र जगन्नाथ माळी, श्री.सुरेश जगन्नाथ माळी, श्री.महादेव जगन्नाथ माळी, कु.निलेश जगन्नाथ माळी, सौ.उषा जगन्नाथ माळी उर्फ उषा भगवान पाटील, सौ.सुरभी संजय इंगळे गं.भा.ताराबाई गोविंद माळी, श्री.नरेश गोविंद माळी, श्री.रमेश गोविंद माळी, सौ.रविना संतोष पाटील, श्री.आनंद गोविंद माळी, श्री.मनोहर गोविंद माळी,.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चाळ (घोट चाळ) | २२/३ | ०-०५-८ |
| २ | चाळ (घोट चाळ) | २५/३ | ७-१४-५ |
| ३ | चाळ (घोट चाळ) | २५/५ | ०-३७-४ |
| ४ | चाळ (घोट चाळ) | २५/१४ | ०-२६-३ |

वर नमूद मिळकती रे.मु.नं.१३१/२०२० वादींच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत तसेच त्या वादींच्या ताबेकब्जा वहिवाटीत आहेत. व त्या सर्व मिळकती वादींच्या हिश्यातील आहेत.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे सात बारा सदरी असलेले भोगवटाधारक यांनी मिळकतीमध्ये जबरदस्तीने भराव करून मिळकतीमध्ये वेअरहाऊस बांधून भाड्याने देण्याच्या तयारीत आहेत. तसेच मिळकत २५/०१/२०२२ रोजी मोजणी करून मिळकत विकण्याच्या तयारीत आहेत. सदरच्या मिळकतीत त्रयस्त इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण झाल्यास आमच्या अशिलांचे कि.जे.रेमु.नं.१३१/२०२० मधील वादी आहेत त्यांचे कधीही भरून न येणारे असे नुकसान होणार आहे.

वर नमूद मिळकतीबाबत वर नमुद प्रतिवादी विरूध्द दावा चालू आहे अशा परिस्थितीत वर नमूद मिळकतीपैकी कोणतीही मिळकत भाड्याने खरेदी विक्रीने,गहाण, दान, करार, मदार किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करून घेऊ नये. तसे केल्यास त्या इसमांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे कोर्टात रे.मु.नं.१३१/२०२० मध्ये पक्षकार करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास सामोरे जावे लागेल हे सर्वास कळावे.

पनवेल
तारीख ०३/०२/२०२२

**ॲड.महेश महादेव गुंजाळ**
जिल्हा न्यायालय अलिबाग
२/१२ भालचंद्र स्मृती विद्यानगर,
अलिबाग,रायगड
९८२२०१३३५०

# अंगणवाडी सेविकांना आरोग्य प्रशिक्षण

**| अलिबाग| विशेष प्रतिनिधी|**



सहाय्यक आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्यातर्फे अंगणवाडी सेविकांसाठी आरोग्यविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त इम्पॅक्ट इंडिया आयुर्वेदिक सेंटर कल्याणचे डॉ. कल्याण गढरी यांनी अलिबाग तालुक्यातील अंगणवाडीसेविकांनाचेंढरेग्रामपंचायत हॉलमध्ये नुकतेच शासनाच्या निर्देशानुसार कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करून मार्गदर्शन केले.

या मार्गदर्शनात कोरोना संसर्ग बाबत जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाय योजना, शरीरातील पिण्याचे पाणी व महत्त्व, पूरक पोषण आहार, वजन वाढविणे/कमी करणे, ॲसिडिटी, बीपी, डायबिटीज, गुडघेदुखी, कंबर दुखी, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे इ. बाबत घरच्या घरी आयुर्वेदिक उपचार कसे करावेत याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी काही आजारांवर प्रत्यक्ष कृती करून कशा प्रकारे उपचार करता येतील याचे प्रात्यक्षिक दाखविले. अलिबाग तालुक्यातील एकूण २७३ अंगणवाडी सेविकांना यावेळी प्रशिक्षण दिले. सदरील प्रशिक्षण पंचायत समितीचा सेस फंडातील १० ० महिला बालकल्याण निधीतून हे प्रशिक्षण घेण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सभापती प्रमोद ठाकूर तसेच प्रभारी गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर साळकर यांचे अनमोल सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील, विस्तार अधिकारी अपर्णा पाटील शिंदे, चेंढरे ग्रामपंचायत सरपंच स्वाती पाटील, पर्यवेक्षिका भाग्यश्री पाटील, दीप्ती मोकल, सामिया पेरेकर आदींचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्ताराधिकारी अपर्णा शिंदे यांनी, तर आभार प्रदर्शन जिविता पाटील यांनी केले.

# आदिवासी बांधवांना मायेची ऊब

**| कर्जत | वार्ताहर |**

तालुक्यातील कळंबोली, सालवड आदिवासी वाडी येथे आदिवासी बांधवांना माघी गणेशोत्सवाचे औचित्य साधत ब्रम्हगुरु फाऊंडेशनमार्फत २०० ब्लँकेटचे वाटप करण्यात आले आहे.

याप्रसंगी ब्रम्हगुरु फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत शिंदे, ट्रस्टी ब्रिजेश सिंग, कॅप्टन अंशु अभिषेक, प्रशांत सिंग, सत्यम सिंग, समाजसेवक ॲड. संपत हडप, ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर सरपंच साक्षी संतोष मोहिते, सदस्या शैला हिलम, दशरथ देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री सेवाशक्ती पतसंस्थेच्या अध्यक्षपदी सीताराम कवळे, उपाध्यक्षपदी संपदा दाबके

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**



अलिबाग तालुक्यातील चोरोंडे येथील श्री सेवाशक्ती ग्रामीण पतसंस्थेची निवडणूक संस्थेच्या कार्यालयात नुकतीच पार पडली. या निवडणुकीत पतसंस्थेच्या अध्यक्षपदी सीताराम कवळे यांची, तर उपाध्यक्षपदी संपदा दाबके यांची २०२१-२२ ते २०२६-२७ या कालावधीसाठी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.

श्री सेवाशक्ती पतसंस्थेने २५ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. तसेच १६ कोटींचे कर्ज वाटप केले आहे. तसेच गेली तीन वर्षे संस्थेचा बँको पुरस्काराने सन्मान झाला आहे. मानाचा दीपस्तंभ पुरस्कारही संस्थेस मिळाला आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम सीताराम कवळे यांनी हे यश मिळवल्याने संस्थेची अधिक भरभराट व्हावी या उद्देशाने त्यांची संस्थेच्या अध्यक्षपदी एकमताने फेरनिवड झाली. तर उपाध्यपदी संपदा दाबके यांचीही बिनविरोध फेरनिवड झाली.

संचालक म्हणून नितीन अधिकारी, संतोष राऊत, केशव चांदोरकर, सुनील थळे, राजन नार्वेकर, समद बद्रुद्दिन कूर, स्मिता राऊत यांचीही बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सेवानिवृत्त लेखापरीक्षक संदीप गोठीवडेकर यांनी काम पाहिले. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी संदीप गोठीवडेकर यांनी केलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल नितीन अधिकारी यांनी त्यांचे आभार मानले.

पान १ वरुन

## आशाताईंची सरकारकडून निराशा

इतर उपाययोजना अशा आरोग्याबाबत महत्वपूर्ण जबाबदाऱ्या आशाताई पार पाडत असतात. ग्रामीण भागातील आरोग्याच्या दूत म्हणून त्या कार्यरत आहेत. अशा वेळी ग्रँण्ड नाही, सॉफ्टवेअरची समस्या अशा कारणांमुळे वारंवार त्यांना उशिराने मानधन मिळत असते. तरीदेखील आशा ताई मोठ्या इमानेइतबारे आपली सेवा देत असतात. सर्व्हेक्षणाबरोबरच प्राथमिक आरोग्य केंद्रात देखील त्यांना काम करावे लागते. प्रत्येक घरोघरी भेटी देऊन सर्व्हेक्षण करावे लागते. मात्र काम करुन देखील वेळेवर मानधन मिळणार नसेल तर काय करणार असा प्रश्न आशाताईंना पडला आहे. त्यात अनेक कागदपत्रांच्या झेरॉक्स, प्रवासखर्चदेखील स्वतःच्या पदरचा करावा लागतो. कोव्हीडसाठी पूर्वी दिले जाणारे मानधनदेखील आता दिले जात नाही. त्यामुळे जर लसीकरण झाले, तरच मानधन मिळते अन्यथा रजिस्टर आणि बैठका यांच्यावरच मानधन मिळते, ते फार अत्यल्प असते. त्यामुळे आशा सेविकांच्या कामाचा विचार करुन त्यांना प्रत्येक महिन्यात वेळच्या वेळी मानधन शासनाने नियमितपणे द्यावे अशी मागणी होत आहे.

## पूरसमस्येबाबत महाडकर आक्रमक

पूर येत असल्याने व्यापारी, त्याचबरोबर नागरिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. सन २०२१ मध्ये शहरामध्ये प्रलयंकारी महापूर आल्याने प्रचंड आर्थिक नुकसान झाले. या महापुराच्या आपत्तीनंतर पूरपरिस्थिवर उपाययोजना करण्याबाबत शासनाकडून योग्य ते उपाय योजले जात नसल्याने आणि केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत पुरेशी यांत्रिक साधने उपलब्ध होत नसल्याने शनिवारी नागरिकांनी स्थापन केलेल्या पूर निवारण समितीतर्फे प्रांत कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये शहरातील हजारो नागरिकांचा सहभाग असल्याने शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत नागरिकांकडून तीव्र भावना व्यक्त केल्या जात होत्या.

शहरातील पूरपरिस्थितीवर नियंत्रण आणण्याकरिता शासनाने योग्य ते उपाय योजावेत, अशी मागणी गेल्या सहा महिन्यांपासून नागरिकांकडून केली जात होती. शासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने शासनाचा निषेध व्यक्त करण्याकरिता मोर्चाचे आयोजन केले होते. त्याचबरोबर शहरातील व्यापाऱ्यांनीदेखील आपली दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला. महाड शहरातील नागरिक पूरपरिस्थिती उपायाबाबत आक्रमक झाले असून, नदीतील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झालेली असली तरी, या कामाला गती देण्याकरिता पुरेशी यंत्रणा उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्ते या मोर्चामध्ये सहभागी झाले असून, शासनाने नागरिकांच्या भावनेचा विचार करुन सुरु असलेल्या कामाला गती दिली नाही, तर पुढील आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा पूर निवारण समितीकडून देण्यात आला आहे.

## व्यावसायिकांवर उपासमारी

काम बंद आंदोलनात अलिबाग आगारातील चालक, वाहक, डेपोतील अधिकारी, क्लार्क यांनी सहभाग घेतला आहे. अलिबाग बसस्थानकामध्ये असलेल्या गोळ्या, बिस्किटं, फळे विकणाऱ्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सध्या अलिबाग आगारातून तीन ठिकाणच्या एसटी बसेस सोडल्या जात आहेत. तरीही आगारात पहिल्यासारखी गर्दी दिसून येत नाही. सर्व एसटी बसेसच्या सेवा सुरू झाल्या नसल्याने प्रवासी बसस्थानकाकडे फिरकत नाहीत. बसस्थानकात शुकशुकाट असल्याने उपाहारगृह, चहा कॅन्टीन, पान टपऱ्या, फळे विक्रेत्या करणाऱ्या महिला आदींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच ग्रामीण भागातून अलिबाग शहरामध्ये व्यवसायासाठी येणाऱ्या छोट्या व्यावसायिकांचे प्रचंड हाल होत आहेत. दररोज सकाळी नेहमीच्या बसने अलिबाग शहरात विक्रीसाठी माल घेऊन येणाऱ्या व्यावसायिकांची बस बंदमुळे मोठी अडचण झाली आहे. दुचाकी किंवा अन्य वाहन नसल्याने या व्यावसायिकांना खासगी वाहनात जादा दर देऊन अलिबागला यावे लागत आहे. खासगी वाहनांनीही संधीचा फायदा घेत नेहमीपेक्षा दर वाढवले आहेत. त्यामुळे छोट्या व्यावसायिकांचा जीव मेटाकुटीला आला आहे.

***पूर्वी लॉकडाऊनमुळे व्यवसाय बंद पडला होता. आता कुठे सर्वकाही पूर्वपदावर येत असताना, एसटी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामुळे बाहेरुन येणाऱ्या प्रवाशांची ये-जा कमी आहे. त्याचा परिणाम व्यवसायावर झाला असून, आर्थिक संकट ओढावले आहे.***

***- शरद राऊत, अध्यक्ष, रिक्षा संघटना***

## नितेश राणेंचा मुक्काम वाढला

त्यामुळे यांची अडचण वाढली आहे. दरम्यान, या दोन दिवसांच्या कालावधीत पोलिसांनी नितेश यांची कसून चौकशी केली. तपासाचा भाग म्हणून पोलीस त्यांना गोव्यातही घेऊन गेले होते. तसेच राकेश परब आणि नितेश राणे यांचीही समोरासमोर चौकशी करण्यात आली. यात पोलिसांच्या हाती आणखी काही महत्वाचे धागेदोरे लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानंतर सिंधुदुर्ग कोर्टा आणण्यात आले. यावेळी पोलिसांनी नितेश यांची ८ दिवसांची पोलीस कोठडी वाढवून देण्याची मागणी केली. नितेश आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा या गुन्ह्यात आर्थिक व्यवहार झाला, का याचा तपास करायचा आहे.


# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त






लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. मातोश्री रतनबेन ताराचंद विकमाणी, स्मरणार्थ, सांगली**



**डॉ. श्री. निखिल शिवपाल तिवारी, लग्नानिमित्त, अलिबाग**

**स्व. वसंत शालिनी, स्मरणार्थ**

**श्री. चिरंतन उदय राऊत, वाढदिवसानिमित्त, अलिबाग**

**सौ. स्नेहा सतीश कर्वे, वाढदिवसानिमित्त, अलिबाग**

# जिल्ह्यात माघी गणेश जन्मोत्सवाचा उत्साह

**मंदिर परिसरात चैतन्याचे वातावरण; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**

**कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दोन वर्षांनंतर पहिल्यांदाच मंदिरे दर्शनासाठी खुली असल्याने शुक्रवारी माघी गणेशोत्सवानिमित्त 'गणपती बाप्पा मोरया'चा गजर ऐकू आला. पहाटेपासूनच पूजाविधीला प्रारंभ झाल्याने गणेश दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. गणपती बाप्पा मोरयाचा होणारा गजर, गणपती अथर्वशीर्ष पठणाचा गुंजणारा स्वर, आकर्षक रांगोळ्या आणि गणेश आरतीच्या मंगल सुरावटींनी भक्तीमय झालेल्या वातावरणात माघी गणेश जन्मोत्सव सोहळा रायगड जिल्ह्यातील अष्टविनायकांपैकी एक असलेला पालीचा बल्लाळेश्वर, महडचा वदरविनायक, चिरनेरचा महागणपती आदींसह ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. जास्वंदीची फुले, दुर्वांचे हार अर्पण करून गणेशमूर्तींची आकर्षक पूजा हे गणेश जयंतीचे वैशिष्ट्य ठरले.**

## बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

महाराष्ट्रातील अष्टविनायक देवस्थानांपैकी एक पालीतील बल्लाळेश्वराचा माघी मासोत्सव व जन्मोत्सव शुक्रवारी (ता.४) मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टने राज्यातून व जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांसाठी उत्तम सुविधा करण्यात आली होती. यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन नियम व अटी शर्तींचे पालन करून विधान धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. संपूर्ण परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

जन्मोत्सवाला बाळ गणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तिभावाने पाळणा हलविण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्‍वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे व राहुल मराठे आदींसह मंदिर पुजारी व गुरव, धनंजय गद्रे आदी मान्यवर व भक्त उपस्थित होते. जन्मसोहळ्याच्या कीर्तनास व इतर कार्यक्रमात फक्त ५० भाविक उपस्थित होते.

माघी महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर मंदिर व परिसरात रोषणाई, रांगोळी व सजावट करण्यात आली होती.



## माघी गणेश जयंती साजरी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील कुंभार वाड्यातील संतोष रामचंद्र दर्गे यांच्या निवासस्थानी असणाऱ्या मंदिरात माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला. मागील २२ वर्षांपासून उत्सव साजरा करण्यात येत आहे. दरम्यान, आज सकाळपासून भाविकांनी गणेश दर्शनासाठी गर्दी केली होती.

## महडच्या वरदविनायकाचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे महामार्गावर असलेले अष्टविनायकांपैकी महड गावातील वरदविनायक येथे गणपती उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. यानिमित्त हर्षद महाराज जोगळेकर यांचे कीर्तन झाले. यावेळी भव्य दिव्य अशी रांगोळी (वरद विनायक फुल रांगोळी मंडळ) यांनी साकारली. ही रांगोळी रवि आचार्य नेरळ यांच्या मार्गदर्शनाखाली मंगेश देशमुख-माणकीवली, सचिन पाटील-कलोते, तुळशिराम ठोंबरे- टेंभरी, साक्षी देशमुख, कविता देशमुख, वंदना देशमुख, लीना पाटील, तसेच व्यवस्थापक अतुल तट्टू आदी कलाकारांनी साकारली. या रांगोळीमध्ये झाडे जगवा त्यांना नष्ट करु नका असा संदेश देण्यात आला. दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात दाखल झाले होते.



## सार्वजनिक व्यायामशाळेच्या अध्यक्षपदी संजय पाटील



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील सार्वजनिक व्यायामशाळेच्या अध्यक्षपदी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय पाटील यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल नगरसेवक ॲड. गौतम पाटील, व्यायामशाळेचे विश्‍वस्त श्रीकांत शिंदे, महेंद्र घासे, तसेच सदस्य अभिनेते देवदत्त नागे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष संजय पाटील यांनी व्यायामशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी वाढत असल्याने व्यायामशाळेची जागा अपुरी पडत असून, त्यादृष्टीने लवकरच नवीन विस्तार करण्याचा मानस व्यक्त केला. त्याचप्रमाणे व्यायामशाळेत आणखी अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन भविष्यात व्यायामशाळेचे नावलौकिक आणखी वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. संजय पाटील यांची निवड होताच अनेकांनी त्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- WORK FROM HOME ९५०३०५८६२४
- ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- पुरुष व महिला कामगार आवश्यक संपर्क- ९६०४५२०२६२, ८२०८८९३३२३
- वधु-२, वय २३/२६, बारावी /B.A, आई वडिलांचे अपघाती निधन, शेती ४ ऐकर, मुली मामाकडे राहतात. ९९७५६२८६४४/९९७५४९२३४४.
- डिश टीव्ही कंपनीसाठी 'Technician' आहेत. पगार ७०००-९००० रुपये स्वत:ची बाईक असावी. Contact- 7448202022/7721931234
- पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०
- पाहिजेत सातघर-अलिबाग येथील साईटकरिता रिअल इस्टेट सेल्स एक्झिक्युटीव्ह, २ ते ५ वर्षांचा अनुभव, ग्रॅज्युएट असणे आवश्यक. संपर्क : ७९७७३१४५६०
- १६ गुंठे शेतजमीन विकणे आहे. बेलकडे-अलिबाग संपर्क : ८८०५०२२४६७
- लायन्स क्लब ऑफ श्रीबाग व तन्ना कन्सल्टन्सीद्वारा आयोजित बजेट २०२२, त्याचे परिणाम जाणून घ्या तज्ज्ञ : मितेश कतिरा APMH, धनेश शाह CA APMH व भरत तन्ना. पत्ता : वेव्ह हॉटेल, अलिबाग. रविवार, दि. ६/२/२०२२, सकाळी १०.३० वा. आपले आरक्षण W/P वर करा. संपर्क : ८२९१२७८३८३

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## म्हसळा येथे माघी गणेशोत्सव उत्साहात



**। म्हसळा । वार्ताहर ।**

दैवज्ञ समाज गणेश मंदिर ट्रस्ट म्हसळा यांच्या विद्यमाने म्हसळा येथील श्री गणेश मंदिरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांतर्गत ४ फेब्रुवारी रोजी पहाटे सहा वाजता श्रींची अभिषेक पूजाविधी, दैवज्ञ समाज महिला मंडळ यांचे संगीत भजन, सिद्धीकला भजन मंडळाचे संगीत भजन, दिनांक ५ फेब्रुवारी विविध धार्मिक कार्यक्रमासाह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सुनिल उमरोठकर यांनी सांगितले.

माघी गणेशोत्सवानिमित्त रोहा येथील कीर्तनकार मंदार भावे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाच्या कार्यक्रमास सुनील उमरोठकर, अनिल पोतदार, बाल करडे, महादेव पाटील, गौरव पोतदार, दिलीप करंबे, महेंद्र पोतदार,गौरी प्रसाद, प्रसाद पोतदार, संपदा पोतदार, दादा पानसरे, प्रदीप कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

## माघी गणेशोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा



**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

ग्रामीण भागात विविध परिसरातील गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव कोरोनाचे नियम पाळून पार पाडण्यात आला. यावेळी अभिषेक, कीर्तन, हरिपाठ, सत्यनारायणाची महापूजा, काकडा आरती, हरिजागर, सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मंदिर परिसरात मंडप, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गणेशभक्त ग्रामीण भागातून येऊन गणेशाचे दर्शन आणि भजन, कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घेत होते.

## महागणपती चरणी भक्तांची मांदियाळी

**। जेएनपीटी । वार्ताहर ।**

कोरोनाचे संकट काही अंशी दूर झाल्याने हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चिरनेर गावातील महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी शुक्रवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी आलेल्या गणेश जयंतीनिमित्ताने जुळून आला. यावेळी नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील भक्तांची मंदिर परिसरात मांदियाळी दिसून आली.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना श्रींच्या दर्शनापासून वंचित राहावे लागले होते. त्यांची ही इच्छा यानिमित्ताने पूर्ण झाल्याने चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती. मंदिर परिसरात ये-जा करणाऱ्या भाविकांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करावे, अशा सूचना देवस्थानच्या कमिटीकडून देण्यात येत होत्या.

## मंदिरे गजबजली

**। पनवेल । वार्ताहर ।**

तालुक्यात माघी गणेश जयंतीचा उत्साह पाहायला मिळला. त्यानिमित्त सर्व मंदिरे सजली असून, भाविकांच्या गर्दीने तालुक्यातील सर्व मंदिरे पुन्हा एकदा गजबजून होती. सकाळपासूनच भाविकांनी बाप्पाच्या



दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसरात फुलांची विशेष आरास करण्यात आली आहे.



## स्मार्ट रायगड बाजारचे भाग्यवान ग्राहक

स्मार्ट रायगड बाजारने 'ऑफर्स भी, इनाम भी' या दि. २१ ते २६ जानेवारीपर्यंत जाहीर करण्यात आलेल्या लकी ड्रॉचे सुनील मोहंती हे भाग्यवान विजेते ठरले. त्यांना सॅमसंग फ्रीज मिळाला असून, रायगड बाजारचे व्हाईस चेअरमन प्रमोद घासे, व्यवस्थापक दिलीप तांडेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## अलिबागमध्ये पेडणेकर ज्वेलर्सचे राजेशाही प्रदर्शन



**। अलिबाग । प्रतिनीधी ।**

प्रसिद्ध सोन्या-चांदीचे व्यापारी जगन्नाथ गंगाराम पेडणेकर यांच्या राजेशाही कलेक्शनच्या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी दि. ४ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध व्यावसायिक जयदास माळी यांच्या हस्ते अलिबागमधील मेपेल आयव्ही हॉटेलमध्ये झाले. यावेळी पेडणेकर ज्वेलर्सच्या संचालिका आसावरी पेडणेकर व व्यवस्थापक योगेश पेडणेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**आम्रपाली डिझाइन कलेक्शनचे ग्राहकांना आकर्षण**

या प्रदर्शनात सोन्याच्या दागिन्यांसह रियल डायमंड व चांदीच्या दागिन्यांची कलाकुसर ग्राहकांना पाहायला मिळणार आहे. या प्रदर्शनात २२ कॅरेट हॉलमार्कचे सोन्याचे दागिने तसेच १८ कॅरेट रियल डायमंडचे दागिने ग्राहकांचे आकर्षण ठरत आहेत. रियल डायमंड दागिन्यांच्या घडणावळीवर ५० टक्के, तर सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १५ टक्के सवलात देण्यात आली आहे. तसेच चालू भावात जुने सोन्याचे दागिने घेऊन त्याबदल्यात नवीन दागिने बनवून मिळणार आहेत.

या प्रर्दशनात सोन्याच्या दागिन्यांमध्ये आम्रपाली डिझाइन कलेक्शन हे ग्राहकांचे खास आकर्षण ठरत आहे. तसेच सोन्याचे नवनवीन प्रकार ग्राहकांना याठिकाणी पाहायला मिळणार आहेत. राणी हार, केरला वर्क, गळ्याभोवतीचा चोकर हार त्याचबरोबर टेम्पल ज्वेलरी, कर्णफुले, नेकलेस, बांगड्या, गजांत लक्ष्मी नेकलेस, ठुशी, पोलकी डिझाईन, कुंदन वर्क, पाचू वर्क, रुबी वर्क, गजरा मंगलसूत्र, टेम्पल मंगजसूत्र, पिंजरा गंठण, श्रीदेवी कलेक्शन, गेरू वर्क, बाजूबंद, शिवकालीन शिंदेशही तोडे, सोने साखळी, मोती पोवळे तसेच केरला वर्क असे अनेक प्रकार चाहत्यांच्या नजरेस पडणार आहेत. पेडणेकर ज्वेलर्सचे राजेशाही प्रदर्शन दि. ४ ते ७ फेब्रुवारीपर्यंत सुरु राहणार असून, नवनवीन कारागिरी व राजेशाही दागिन्यांची मोहक करणारी अशी कलाकुसर ग्राहकांच्या भेटीस पडणार आहे. नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व आपल्या दागिन्यांच्या खजिन्यामध्ये भर पाडावी, असे आवाहन पेडणेकर ज्वेलर्सकडून करण्यात आले आहे.







## संपादकीय

# डिजिटल कोणासाठी?

केंद्र सरकारने मंगळवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पात ठळकपणे वारंवार उच्चारला गेलेला शब्द म्हणजे 'डिजिटल'. डिजिटल म्हणजे तरुण असेही समीकरण सांगितले जात असले, तरी ते अर्धसत्यच आहे. कारण, देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक कंपनी पन्नास वर्षांहून जुनी झाली, तर दुसरी पन्नाशीकडे जात आहे. अर्थात, हे नवे क्षेत्र साहजिकच तरुणांसाठी आकर्षक आहे आणि आपल्यालाही जगाच्या वेगाशी जोडले राहण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करीत राहावे लागते. दूरध्वनी तंत्रज्ञानात आपण टूजीपासून फोरजीपर्यंत आलो आणि आता 'फायजी'चा जमाना आहे. त्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. तसेच त्यांनी मुलांचे शिक्षण बुडाल्याने दोनशे टीव्ही वाहिन्या शिक्षणासाठी सुरू करण्याची घोषणा केली. त्याशिवाय, आभासी चलन म्हणजे 'क्रिप्टो करन्सी' याबाबतही काही घोषणा केल्या, तर 'ड्रोन' या नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने केलेली तरतूदही जाहीर केली. या सगळ्यांतून या डिजिटलजगताचा संसार त्यांनी नेमका काय आणि कोणासाठी मांडला, हे पाहणे आवश्यक आहे. पहिला मुद्दा आहे, अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी डिजिटल रुपयाची घोषणा केली, त्याचा. म्हणजे, भारतीय रिझर्व्ह बँक आता बिटकॉइनसमान स्वत:चे चलन काढणार आहे. यात 'ब्लॉकचेन' या तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार आहे. बाकी बिटकॉईनपेक्षा भारतीय चलनात असणार असलेला महत्त्वाचा फरक म्हणजे, बिटकॉइनच्या व्यवहारात निनावी राहण्यालाच महत्त्व असते; परंतु रिझर्व्ह बँकेकडून डिजिटल रुपया खरेदी करताना तुमची संपूर्ण कुंडली तुमच्या व्यवहारांत नोंदवलेली असणार आहे. डिजिटल रुपया हा नोटेसमान असणार आहे आणि तो थेट रिझर्व्ह बँकेकडून मिळणार असल्याने स्वाभाविकपणे त्यावर सामान्य जनतेचा विश्वास जास्त असण्याची शक्यता आहे. क्रिप्टो व्यवहार दोन प्रकारचे असतात, एक चलन आणि दुसरे मालमत्ता. यंदा एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात सदर चलन जारी करेल. आता रिझर्व्ह बँकेऐवजी अर्थमंत्र्यांनीच याची घोषणा केली आणि त्यावर कर लावण्याचीही केली. आतापर्यंत रिझर्व्ह बँकेचे या आभासी चलनाला मान्यता देण्याबाबचे धोरण सुस्पष्ट नव्हते. अजूनही नाही. अर्थमंत्र्यांनी घोषणा करूनही नाही. रिझर्व्ह बँकेकडूनही नाही. तरीही अर्थमंत्र्यांनी एकीकडे रिझर्व्ह बँक देशी आभासी चलन जारी करणार असल्याचे जाहीर केले आहे, तर देशात मान्यता नसलेल्या या डिजिटल व्यवहारांवर तीस टक्के कर मात्र लावण्याचे जाहीर केले आहे. या तर्काने आता सरकार कशावरही कर घेईल आणि संबंधित व्यवहार मान्यताप्राप्त करून देईल का, असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. दुसरा मुद्दा नवीन शिक्षण वाहिन्यांचा. शैक्षणिक वाहिन्या तर अनेक दशकांपासून सुरू आहेत. त्यात आणखी नवीन भर घालून काय साध्य होणार, हा प्रश्न आहे. डिजिटल शिक्षणाची व्याप्ती वाढवण्याचा हेतू चांगला मानला तरी पायाभूत शिक्षण सक्षम करण्याच्या गरजेचे काय, याचे उत्तर मिळत नाही. नव्या शैक्षणिक धोरणातील तरतुदींनुसार शिक्षक सक्षम कसा होईल, हेही कळत नाही. त्यासाठी अर्थसंकल्पात काहीही नाही. शिवाय, शिक्षणासाठीची तरतूद वाढवूनही अनेकदा ती खर्च होत नाही, हा प्रश्न वेगळाच आहे. याव्यतिरिक्त, अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या डिजिटल विद्यापीठाबाबत चर्चा हवी. घोषणा आकर्षक असली तरी सातत्याने नवीन घोषणा करून आधी जाहीर केलेल्या गोष्टींचे काय झाले, याची समीक्षा नसेल तर काहीही उपयोग नाही. देशातील उच्च शिक्षणाचा पाया ही प्रामुख्याने राज्या-राज्यांत विस्तारलेली विद्यापीठे आणि महाविद्यालये असतात, तर त्यासाठी काहीच तरतूद दिसत नाही. आयआयटीसारख्या संस्थांची तरतूद वाढवली असली, तरी अन्य उच्च शिक्षण संस्थांसाठी काय, हा गंभीर प्रश्न आहे, अशी टीका देशातील शिक्षणतज्ज्ञांनी अर्थसंकल्पावर केली आहे. 'ड्रोन'सारख्या फॅशनेबल अधिक आणि देशातील मूलभूत समस्या सोडवणाऱ्या कमी असलेल्या तंत्रज्ञानाला अर्थसंकल्पात स्थान देऊन सरकार काय सांगू इच्छिते, हे कळायला हवे होते. मात्र, स्वत:ला काही दिशा नसलेल्या आणि देशातील विविध गरजांची नस जाणून घेण्यास अनुत्सुक असलेल्या अर्थमंत्र्यांकडून आणि एकंदर केंद्र सरकारकडून वेगळ्या अपेक्षा असू शकत नाहीत. मात्र, डिजिटल तंत्रज्ञान आपल्या देशाला वरदान ठरू शकते आणि त्यातून अनेक पातळीवर समस्यांचे निवारण करण्यासाठी उपयोग होऊ शकतो. आपल्यासारख्या कृषीप्रधान देशात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मात्र, तसा द्रष्टेपणा दाखवणारे नेतृत्व नसल्याने अखेर अजून एक संधी वाया गेली, असेच म्हणायला हवे.

# अर्थसंकल्प एक पोस्ट डेटेड चेक!

समीर दिघे

**२२ लाखांचे नवरा बायकोचे उत्पन्न असलेल्या कुटुंबाने यावर्षी ३९ लाख खर्च करायचे ठरवले आहेत. उत्पन्नापेक्षा अधिक होणारा हा खर्च काही सांभाळता न येणारे उद्योग विकून आणि कर्ज घेऊन भागवला जाणार आहे.**



आता हेच लाखाच्या पुढे कोटी लिहून सांगितले तर हे कुटुंब म्हणजेच आपल्या भारत देशाचे बजेट ठरेल. या लेखात लिहिलेले सगळ्या आकडे कोटींमध्ये आहेत, मात्र प्रत्येक वेळी उल्लेख केल्यास सामान्य माणूस कोटींमधील आकडे वाचून भांबावून जातो, म्हणून टाळले आहे.

आता तुम्ही म्हणाल उत्पन्नापेक्षा जास्त खर्च, अबब! कर्जबाजारी होण्याचे उद्योग! मात्र, जसं काही मोठे पायाभूत खर्च उद्याच्या उत्पन्न वाढीसाठी आवश्यक असतात, उदाहरणार्थ या कुटुंबाचे जर हॉटेल असेल आणि त्यात नूतनीकरण आणि काही नवीन शेफ कामावर घ्यायचे असतील, तर आजच्या उत्पन्नापेक्षाही खर्च त्यांना वाढवावा लागेल जेणेकरून काही वर्षात आजचे जे उत्पन्न आहे त्याचा गुणाकारही करता येईल. त्यासाठी त्यांनी जर कर्ज घेतले आणि ज्या क्षेत्रात काही नीट जमत नाहीये, त्या उद्योगांमधली त्यांची गुंतवणूक विकून उभारलेला पैसा जर त्यांचा चालू उद्योगाचा विकासासाठी खर्च करायचं ठरवलं तर? हे मात्र दीर्घ मुदतीचे उद्दिष्ट ठरेल. त्यासाठीच हे बजेट म्हणजे पंचवीस वर्षांची दिशा असणार आहे, असे सूतोवाच करत अमृत महोत्सवाचे बजेट आहे सांगत वित्त मंत्र्यांनी मांडले आहे.

हे करत असताना सरकारने कोणतेही कर बदल करणे टाळले आहे आणि कोणत्याही गोष्टी थेट तात्काळ सुखवणाऱ्या देणेही टाळले आहे. जसे आपण आपल्या मुलांना मोबाईलवर खेळायला देऊन तात्काळ आनंद देऊ शकतो, मात्र त्याने कायम सुखी राहावे त्यासाठी त्याने शिक्षण घेणे गरजेचे मानून त्याला आपण अभ्यासाला बसवतो. इंग्रजीत एक म्हण आहे, 'तुमच्या मुलाला भूक लागली असेल तर त्याला मासा द्या, पण जर तुम्ही नसतानाही तो उपाशी राहू नये वाटत असेल, तर त्याला मासेमारी शिकवा'. काहीसे तसेच या बजेटनेही केलेले आहे. आता इतका खर्च होणार आहे तर तो कशाकशावर करण्यात येणार आहे, हे पाहूया!

**पायाभूत सुविधा विकास**

१९४२ साली जेव्हा चले जाव चळवळ सुरू होती तेव्हा पॅरिस मेट्रो रेल्वेचे उद्घाटन झालेले! आपल्याकडे अजून किती प्रमाणात पायाभूत सोयी-सुविधा उभ्या राहायची आवश्यकता आहे, याची कल्पना करा! याचीच पीएम गती शक्ती योजना जाहीर करण्यात आली आहे, जेणेकरून महामार्ग जाळे विस्तारले जाईल. आपल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेने दोन्ही शहरांचा किती विकास झाला पाहा. आता अशा प्रकाराचे हजारो किलोमीटर्सचे महामार्ग उभे राहात आहेत, त्याचबरोबरोबर रेल्वे, बंदरे, जलवाहतूक, विमानतळ आणि लॉजिस्टिक सेंटर्स शंभर कार्गो टर्मिनल उभे राहणार आहेत, जेथून मोठ्या प्रमाणात सामानाचे व्यवस्थापन आणि वाहतुकीसाठीच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातील. ४१० नव्या वंदे भारत ह्या आधुनिक ट्रेन तयार करण्यात येतील.

इतकंच नाही तर, पाच नद्यांची जोडणी करून शेतीसाठीच्या पाण्याचा प्रश्न ही मार्गी लागणार आहे. ४४ हजार त्यासाठी खर्च होणार आहेत. यासाठी निवडलेल्या नद्या ह्या निवडणूक आलेल्या उत्तर प्रदेशमधील प्रामुख्याने आहेत. मात्र, मतदारांना खुश करण्यासाठी म्हणून कोणत्याही घोषणा केलेल्या नाहीत.

इलेक्ट्रिकल वाहने वाढण्यासाठी बॅटरी स्वापिंग म्हणजे आपल्याकडे जसा गॅस सिलिंडर रिकामा देऊन भरलेला घेतला जातो, तशा प्रकारची व्यवस्था इलेक्ट्रिक वाहने वापरण्यासाठी आणायचे सूतोवाच बजेटमध्ये आहेत.

क्लस्टर झोनस तयार करणे हे ही चीनच्या औद्योगिक विकासाच्या मॉडेलमधील तत्त्व राबवण्यात येणार आहे. जसे आपल्या मुंबईत स्टेशनरीसाठी अब्दुल रहमान स्ट्रीट आहे आणि लाईट्ससाठी लोहार चाळ आहे. चांबड्याच्या वस्तूंसाठी धारावीचे मार्केट आहे. त्या भागात त्या व्यवसायातले सगळे मोठे व्यावसायिक एकाच भागात असतात, त्यामुळे वाहतूक आणि सर्व खर्च मर्यादित होतात आणि नेमकी गोष्ट शोधणाऱ्याला मुंबईभर नाही तर नेमक्या ठिकाणीच जाता येते. ह्याच तत्त्वावर चीनमध्ये सिमेंटचे शहर आहे, लाद्या बनवणारे आहे, मोबाईल फोन बनवणारे, प्लॅस्टिक आणि खेळणी बनवणारे शहर. फर्निचरचे शहर ज्याला फर्निचर घ्यायचे असेल तो नेमक्या त्याच भागात जाऊन सर्व विक्रेत्यांना भेटून ठरवू शकतो त्याला देशभर फिरायची आवश्यकता नाही आणि हे क्लस्टर्स पोर्टसच्या जवळ असल्याने एक्स्पोर्ट करणे सोपे जाईल, आताच आपली निर्यात ही कोव्हिड काळात विक्रमी होते आहे. जागतिक स्थरावर चीन अधिक एक धोरणानुसार असे क्लस्टर्स भारतात तयार करणे, हे मोठ्या प्रमाणात निर्मिती कमी दरात आणि निर्यातपूरक असणार आहेत. त्यामुळे कल्पना करा किती मोठ्या प्रमाणात निर्यात वाढेल!

**खासगीकरण**

सरकारचे काम हे उद्योग चालवणे नसून, उद्योग करणाऱ्यांना उद्योगपूरक वातावरण देणे आणि उद्योगाचे नियमन करणे हे आहे. १३८५ सरकारी मालकीचे उद्योग आहेत. त्यापैकी केवळ ८५ कंपन्या प्रॉफिटमध्ये आहेत, १३०० कंपण्या तोट्यात आहेत. सरकारचे जे कामच नाही, त्यात अडकल्याने ही अवस्था आहे, सरकार आता हळूहळू का होईना, हे उद्योग विकायला घेत आहे, त्यातून मिळणारे पैसे हे पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यावर खर्च करणे आहेत, जे आर्थिक प्रगतीसाठी अतिशय महत्त्वाचे धोरण ठरणार आहे.

**'क्रिप्टो'बाबतचे धोरण**

डिजिटल रुपया आरबीआयच्या अधिपत्याखाली ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीच्या सहाय्याने येत्या आर्थिक वर्षात येणार असल्याने भारत हे असे पाऊल उचलणाऱ्या मोजक्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. कोणतेही सरकारी नियमन नसलेल्या ह्या व्यवस्थेवर आरबीआयच्या नियंत्रणाखाली आणणे आणि वाढत जाणाऱ्या कूट चलन साखळ्याना ज्यावर कोणाचेही नियंत्रण नाही या व्यसवस्थेत सरकानेही डिजिटल रुपया आणून इतरांचे अस्तित्वच धोक्यात आणले असून, या व्यवहारावर पायबंद लागेल असा ३० टक्क्यांचा सणसणीत कर पूर्वलक्षी प्रभावाने लावून हे व्यवहार सरकारला आवडणारे नाहीत हे दाखवून देत ठाम भूमिका घेतली आहे.

**शहरी विकास**

गेल्या वर्षीच्या ५४,५८१ ह्यावर्षी ७६ हजार ५४५ ४४ टक्के वाढ करण्यात आली आहे येत्या पंचवीस वर्षांत देशाची ६० टक्क्यांहून जास्त लोकसंख्याही शहरांमध्ये राहणार असल्याने शहरी विकासाला घसघशीत ४४ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे.

**शिक्षण**

शिक्षण ९३ हजार २२४ चे १ लाख चार हजार १२ टक्के वाढ केलेली आहे. डिजिटल युनिव्हर्सिटी स्थापून ऑनलाइन माध्यमातून अतिशय कमी किमतीत दर्जेदार शिक्षण सुविधा मिळणार आहेत. मुलांच्या उच्च शिक्षणासाठी खूप पैसे लागतात, हे येत्या काळात एड्युटेकमुळे इतिहास जमा होणार आहे. प्रादेशिक भाषेतही बारावीपर्यंतच्या प्रत्येक विषयासाठी चॅनेल असणार आहेत, ज्यातून उत्तम दर्जाचे शिक्षण देणारे २०० चॅनेल सुरू करण्यात येणार आहेत.

**आरोग्य**

मागील वर्षीच्या ७१ हजार २६८ च्या तुलनेत ८२ हजार ९२० सुमारे दहा टक्क्यांची वाढ करण्यात आली असून, आरोग्य क्षेत्राचे डिजिटलाइजेशनसाठी मोठी तरतूद केलेली आहे. ज्यातून आरोग्यासाठी एकमेव डिजिटल ओळख असतो आणि आरोग्य सुविधा पुरवठादार आणि सुविधांच्या डिजिटल नोंदणी होतील. यामुळे आरोग्य क्षेत्रात भ्रष्टाचारावर नियंत्रण येणार आहे. तरी आरोग्य सुविधा ज्या प्रमाणात लागणार आहेत त्यासाठी अजूनही पुरेशी वाढ केलेली आहे, असे मला वाटत नाही. हॉस्पिटल बेडची अजूनही खूप कमतरता देशात आहे. त्यामुळे किमान एक लाख कोटी तरी आरोग्य बजेट असणे गरजेचे आहे, त्या तुलनेत खूप कमी तरतूद करण्यात आली आहे.

**शेती**

शेतीच्या विकासासाठी फर्टिलायझर सबसिडी ही ३२ टक्क्यांनी वाढवण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि ड्रोनचा वापर करण्यासाठी सहाय्य देण्यात आले आहे. शेतीकडे एक उद्योग म्हणून पाहण्याची ही एक सुरूवात ठरेल आणि शेतकऱ्यांचे बिचारेकरण थांबवून त्याचा कृषी उद्योजक म्हणून विकास करण्यासाठीची पावले उचलण्यात आली आहेत. कोणत्याही प्रकारे कर्ज माफी आणि त्यासाठी तरतूद वगैरे लोकप्रिय गोष्टींचा उल्लेख ही केलेला नाही.

**सुरक्षा**

गेल्या वर्षीच्या ४ लाख ७८ हजाराच्या तुलनेत ५ लाख २५ हजार करून ह्या क्षेत्रात दरवर्षीप्रमाणे वाढ जरी केलेली असली तरी त्यातील पैसे हे स्वदेशी तंत्रज्ञान विकासासाठी मोठ्या प्रमाणात राखून ठेवलेले आहेत. जेणेकरून पुढील काळात ह्या क्षेत्रासाठी होणारा आयात खर्च कमी होऊन स्वदेशीकरण होईल आणि देशाचा पैसा देशातच खर्च होईल.

रोजगार हमी योजनेसाठीची तरतूद गेल्या वर्षीच्या तुलनेत घसघशीत कमी करण्यात आली आहे, सरकारी योजनांवर रोजगारासाठीचे लोकांचे अवलंबित्व कमी करायचे स्पष्ट धोरण त्यामागे आहे. या बजेटने मध्यमवर्गाला थेट कर सवलती देणे आणि खुश करणे हे टाळले आहे, या वर्गाच्या खांद्यावर अर्थव्यवस्थेचा भार आहे त्या श्रावण बाळ मध्यम वर्गाला फक्त टॅक्स भरणाऱ्या लोकांमध्ये वाढ होत असल्याने अप्रत्यक्ष करांच्या बरोबरीने प्रत्यक्ष कर सरकारकडे यायला लागल्याने केवळ आभार मानून धन्यवाद म्हटले आहे.

## वारा-वारा
भारत रांजणकर

# लसीकरणासाठी शेकापची 'रक्षा'

शेतकरी, कष्टकरी, जनतेच्या न्याय्य हक्कासाठीच शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली आहे. स्व. नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांची चळवळ अजरामर केली. त्यांचाच वारसा स्व. प्रभाकर पाटील, स्व. दत्ता पाटील यांनी पुढे नेला. तोच वारसा माजी मंत्री मीनाक्षी पाटील, आ. जयंत पाटील, पंडित पाटील, सुप्रिया पाटील, भावना पाटील यांनी तितक्याच समर्थपणे चालवला. ॲड आस्वाद पाटील, नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील, चित्रा पाटील, सवाई पाटील यांच्या रुपाने आज शेकापक्षाची चौथी पिढी राजकारण आणि समाजकारण करण्यासाठी पुढे सरसावली आहे. आधुनिकतेतही शेकापची सर्वसामान्यांपर्यंत असलेली नाळ, इथल्या मातीचे नाते याचा विसर या साऱ्यांनी पडू दिलेला नाही. कोरोना काळात देशभरातील जनता संकटाच्या खाईत लोटली गेलेली असताना रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षच जनतेच्या मदतीसाठी कसलीही तमा न बाळगता घराबाहेर स्वतःचा जीव धोक्यात घालून उभा राहिला होता. ॲड. आस्वाद पाटील, चित्रलेखा पाटील, अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक, समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, चित्रा पाटील या साऱ्यांनी आमदार जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या दिवसापासूनच जनतेची गरज लक्षात घेऊन प्रत्येक मदतीचा हात दिला. कोरोनाबरोबरच निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळ, त्यानंतरची अतिवृष्टी या संकटातदेखील जनतेच्या सोबत ठाम उभे राहात त्यांनी मोठ्या प्रमाणावर मदत उपलब्ध करुन दिली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी रुग्णालयांना ऑक्सिजन बेड, विविध यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिलीच, त्याचबरोबर कोव्हिड सेंटर सुरु करुन कोरोनामुक्तीसाठी लढा उभा केला. त्यानंतर कोरोनाच्या नायनाटासाठी लसीकरणाशिवाय पर्याय नाही, हे लक्षात येताच लसीकरण मोहीम सुरु केली. आता नव्याने लसीकरणापासून कोणीही वंचित राहू नये तसेच त्यातील गैरसमज दूर करुन शंभर टक्के लसीकरण व्हावे या हेतूने त्यांनी लस घेणाऱ्या ग्रामस्थांना एक महिना पुरेल इतके अन्न धान्याचे किट उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली आहे. जनतेच्या आरोग्यासाठी एवढा प्रगल्भ विचार करुन त्यासाठी विविध क्लृप्त्या लढवणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचे कार्य निश्चितच थोर आहे.

# हातपाटीला हवा शासनाचा 'हात'

नदी, समुद्रातील गाळउपसा जर वेळेत झाला नाही, तर त्याचे काय परिणाम होऊ शकतात, हे आपण महाड पुरात अनुभवले आहे. शासनाने वाळूच्या लिलावांवर लादलेल्या बंदीमुळे मोठ्या प्रमाणात सावित्री नदीच्या पात्रात गाळ साचला. त्यामुळे नदीच्या पात्रावर झालेल्या परिणामांमुळे सावित्रीने आपले पाणी महाड शहरात सोडले. त्याला इतरही कारणे जबाबदार असतीलही, पण गाळदेखील तितकाच जबाबदार आहे. जर हा गाळ वेळीच काढला गेला असता, तर कदाचित परिस्थिती आणखी वेगळी असती. त्यामुळे भविष्यात हा विचार करुन वाळू उपशाला पुन्हा परवानगी देण्याची गरज आहे. शासनदेखील सकारात्मक विचार करुन पुन्हा वाळूउपसा सुरु करेलच! त्याचप्रमाणे वाळू उपशासाठी आता आधुनिक तंत्रज्ञाचा अंगिकार केला जात असला तरी पारंपरिक हातपाटीच्या उपशाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. हातपाटीने तसेच बुडी मारुन रेतीचा उपसा करण्यासाठी यापूर्वी ज्या पद्धतीने राखीव क्षेत्र ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे सावित्री नदीमध्ये विचारेवाडी ते दासगाव तसेच दासगाव ते सव यादरम्यान राखीव क्षेत्र देण्यात यावे, अशी मागणी हातपाटी वाळू उत्खनन विक्री सहकारी संस्थेने केली आहे. ती योग्यदेखील आहे. महाड तालुक्यातील सावित्री नदीच्या पात्रांमध्ये भोई समाजासह इतर समाजांतील लोकांकडून पिढ्यान्‌पिढ्या रेतीचे हातपाटीने उत्खनन करण्याचा पारंपरिक व्यवसाय करीत आहेत. २००४ मध्ये माजी आ. माणिक जगताप यांनी सातत्याने पत्रव्यवहार करुन राखीव क्षेत्र ठेवण्याची विनंती केली होती. या मागणीचा गांभीर्याने विचार करुन राज्य शासनाने गौण खनिज आणि महसूल वनविभाग यांनी विचारेवाडी ते दासगाव क्षेत्र हातपाटी पद्धतीने रेती उत्खनन करण्यासाठी राखीव गटांतील परवाने देण्याचे आदेश दिले. मात्र २०१७-१८ पासून उत्खननाचे परवाने देणे बंद केले.त्यामुळे डुबी तसेच हातपाटीने रेतीचा उपसा करणारे आणि या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांवर उपाशी राहण्याची वेळ आली. या सर्व गोष्टींचा विचार करुन हे परवाने देणे गरजेचे आहे. शासन नक्कीच सकारात्मक विचार करुन हातपाटी व्यावसायिकांना मदतीचा हात देईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही!



## भगवद्गीता

**किबा विप्र, किबा न्यासी, शुद्र केने नय।**
**येइ कृष्णतत्त्ववेत्ता, सेइ 'गुरू' हय।।**

''एखाद्या व्यक्तीचे विप्र (वैदिक ज्ञानातील विद्वान) असणे, हलक्या जातीत जन्माला येणे किंवा संन्यासाश्रमात असणे हे महत्त्वपूर्ण नाही. परंतु, जर व्यक्ती श्रीकृष्ण-विज्ञानामध्ये पारंगत असेल तर ती परिपूर्ण आणि अधिकृत आध्यात्मिक गुरू होय.'' (चैतन्य चरितामृत मध्य ८.१२८) म्हणून कृष्णभावनेच्या विज्ञानात पारंगत असल्याशिवाय कोणीही प्रमाणित आध्यात्मिक गुरू बनू शकत नाही. वैदिक साहित्यामध्येही सांगण्यात आले आहे की,

**षट्कर्मनिपुणो विप्रो मन्त्रतन्त्रविशारदः।**
**अवैष्णवो गुरूर्न स्याद् वैष्णवः श्वपचो गुरूः।।**

''वैष्णव किंवा कृष्णभावनेच्या विज्ञानात पारंगत असल्यावाचून संपूर्ण वेदविद्येमध्ये तज्ज्ञ आणि विद्वान असा ब्राह्मणही आध्यात्मिक गुरू बनण्यास लायक असू शकत नाही. पण, एखादी व्यक्ती जरी हलक्या जातीत जन्मली असली तरी ती वैष्णव किंवा कृष्णभावनाभावित असल्यास आध्यात्मिक गुरू बनण्यास योग्य आहे.'' (पद्मपुराण)

जन्म, जरा व्याधी आणि मृत्यू या भौतिक अस्तित्वाच्या समस्यांचा प्रतिबंध धनसंचयाने किंवा आर्थिक समृद्धीने होऊ शकत नाही. जगामध्ये अशी अनेक राष्ट्रे आहेत जी जीवनातील सुखसोयींनी समृद्ध, संपत्तीने परिपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या विकसित आहेत. तरीसुद्धा त्या ठिकाणी भौतिक जीवनातील समस्या या आहेतच. विविध मार्गांद्वारे ते शांती प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, त्यांनी श्रीकृष्णांचे त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे (कृष्णभावनाभावित व्यक्ती) किंवा कृष्णविज्ञान सांगितलेल्या भगवद्गीता आणि श्रीमद्भागवत यांसारख्या शास्त्रांद्वारे मार्गदर्शन घेतले तरच त्यांना खरी शांती प्राप्त होऊ शकते.

आर्थिक विकास आणि भौतिक सुखसोयीमुळे एखाद्याचे कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय मदांधता याबद्दलचे दुःख दूर होऊ शकत नाहीत. असे असते तर अर्जुनाने म्हटले नसते की, पृथ्वीवरील प्रतिस्पर्धीविरहित राज्य किंवा स्वर्गलोकातील देवतांसारखे सार्वभौमत्वही माझा शोक दूर करू शकत नाही. म्हणून त्याने कृष्णभावनेचा आश्रय घेतला. शांती व समाधानप्राप्तीचा तोच योग्य मार्ग आहे. आर्थिक प्रगती किंवा जगावरील सार्वभौमत्व याचा भौतिक प्रकृतीच्या प्रलयामुळे क्षणार्धातच विनाश होऊ शकतो. आता मनुष्य चंद्रलोकावर जाण्याचा प्रयत्न करीत आहे, परंतु उच्चतर ग्रहलोकावर जाण्याइतपत प्रगतीचाही विनाश एकाच फटक्यानिशी होऊ शकतो. भगवद्गीताही याची पुष्टी करते की, क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति- 'जेव्हा पुण्यकर्माच्या फलांचा अंत होतो, तेव्हा मनुष्याचे आनंदाच्या अत्युच्च शिखरावरून जीवनातील अत्यंत खालच्या पायरीइतपत पतन होते.' जगातील अनेक राजकारण्यांचे याप्रमाणे अधःपतन झाले आहे. असे पतन केवळ अधिक शोकालाच कारणीभूत होते.

यासाठी जर आपल्याला कायमचा शोक आवरायचा असेल, तर ज्याप्रमाणे अर्जुन हा श्रीकृष्णांचा आश्रय घेत आहे, त्याप्रमाणे आपणही श्रीकृष्णांचा आश्रय घेतला पाहिजे. म्हणून अर्जुनाने श्रीकृष्णांना निश्चितपणे आपल्या समस्यांचे निराकरण करण्यास सांगितले आणि तोच कृष्णभावनामृताचा मार्ग आहे.

**सञ्जय उवाच**
**एवमुक्त्वा हृषीकेश गुडाकेशः परन्तपः।**
**न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ।।९।।**

सञ्जयः उवाच-संजय म्हणाला; एवम्-याप्रमाणे; उक्त्वा-बोलून; हृषीकेशम्-इंद्रियांचे स्वामी श्रीकृष्ण यांना उद्देशून; गुडाकेशः-अज्ञानाने नियंत्रण करण्यात प्रवीण असलेला अर्जुन; परन्पः-हे परंतप (शत्रूला त्रस्त करणार); न योस्ते-मी युध्द करणार नाही; इति-याप्रमाणे; गोविन्दम्-इंद्रियांना आनंद देणाऱ्या श्रीकृष्णांना उद्देशून; उक्त्वा-सांगून; तूष्णीम्-स्तब्ध, बभूव-झाला; ह-खचित.

**संजय म्हणालाः याप्रमाणे बोलून झाल्यावर परंतप अर्जुन श्रीकृष्णांना म्हणाला, 'हे गोविंद! मी युध्द करणार नाही' आणि स्तब्ध झाला.**

(क्रमशः)

## लोकसंसद

### बंड्यातात्यांवर कारवाई करू नये!

वारकरी संप्रदायाचे बंड्यातात्या कराडकर यांना टीव्ही पत्रकाराने शब्दात फसवून तात्यांच्या वक्तव्याने जे वादळ उठले, त्याला प्रसारमाध्यमातील पत्रकार खरे दोषी आहेत. वाईन विषयानुसार बंड्यातात्यांशी शाब्दिक खेळ करत त्यांच्याकडून वादग्रस्त विधान आपल्या चॅनेलला कसे पोषक ठरेल, याची काळजी कूबुद्धीने केलेली लक्षात येते. बंड्यातात्या हे वयस्कर आहेत, तरी त्यांनी वाद वाढू नये म्हणून माफी मागितली आहे. महिला आयोग व पोलिसांनी हे प्रकरण ताणून न धरता सदर घटनेवर पडदा टाकून वादग्रस्त वक्तव्य निर्माण करण्यास कारणीभूत ठरलेल्या टीव्ही पत्रकाराला कडक भाषेत समज व शक्य असल्यास कायेदशीर कारवाई करायला हरकत नाही. जेणेकरून सामाजिक वातावरण गढूळ होणार नाही.

- यशवंत चव्हाण, बेलापूर

### अंदाजपत्रक सर्वसमावेशक

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतेच २०२२-२३ चे केंद्रीय अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले. गेली सुमारे दोन वर्षे कोरोनाच्या साथीने अनेकांना जीव गमवावे लागले. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या. रोजगार तुटवडा निर्माण झाला. व्यापारी लाकडाऊनमुळे नुकसानीत आले. या पार्श्वभूमीवर हे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. गरिबांसाठी अनेक योजना या अंदाजपत्रकात आहेत. त्यामध्ये ८० लाख घरे बांधण्यात येणार आहेत. केंद्रीय अंदाजपत्रकात मानसिक आरोग्यावर एक वेगळी तरतूद करण्यात आली आहे. मानसिक आरोग्यावर केंद्रीय अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. याचसाठी एका खास कार्यक्रमाची निर्मिती करण्यात येणार असून, या कार्यक्रमाचे नाव 'राष्ट्रीय टेली मानसिक आरोग्य कार्यक्रम' असे आहे. या कार्यक्रमामध्ये ज्या लोकांना मासिक समस्यांना तोंड द्यावे लागते, त्यांना फोनवरून समुपदेशन मिळणार आहे. तणाव, नैराश्य, अस्वस्थता यासारख्या समस्यांवर नागरिक बोलू शकतील. यावरून तज्ज्ञाशी फोनवरून संभाषण साधता येईल व योग्य वेळी उपचार करता येतील. शहरी भागात मानसोपचार तज्ज्ञ असतात, पण खेड्यात यांची कमतरता असते. या योजनेंतर्गत राष्ट्रीय पातळीवर २३ हेल्प लाईन सुरु करण्यात येणार आहेत.

यासाठीचे सहाय्य बंगळुरूस्थित आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्था करणार आहे. अर्थात, या योजनेचे सर्व तपशील अजून जाहीर होतील. पण, सरकारचा हा निर्णय अनेक मानसिक रुग्णांना दिलासा देणारा आहे. खाद्यतेल आयातीत कपात करण्यात येणार असून, तेलबियांचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. हिंगसुद्धा स्वस्त होणार आहे. येत्या तीन वर्षांत सुमारे ४०० 'वंदे मातरम्' गाड्या सुरु करण्यात येणार आहेत. नागरिकांचा प्रवास सुखकर व सुरक्षित होणार आहे. कपडे स्वस्त होतील. कृषी उपकरणे, मोबाईल फोन स्वस्त होतील. या साऱ्या तरतुदी गरीब व सर्वसामान्य जनतेसाठी आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट हमीभाव रक्कम २.३७ लाख कोटी एवढी जमा होणार आहे. १६३ लाख शेतकऱ्यांचा १२०८ मेट्रिक टन्स गहू व धान सरकार खरेदी करणार आहे. पीपीई मोडमध्ये अनेक योजना सुरु होणार आहेत. उद्योगासाठी ७.५५ लाख कोटी खर्च करण्यात येणार आहेत. नाबार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांना निधी देण्यात येणार आहे. प्राप्तीकराच्या रचनेत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत, हा मध्यम वर्गीयांना एक दिलासाच आहे. अर्थात, गरीबांची छत्री मात्र का महाग होणार, हे समजू शकलेले नाही. उद्योगाच्या दृष्टीने स्टीलच्या किमती कमी करण्याच्या दृष्टीने त्यावरील आयात शुल्क कमी करण्यात आले आहे. निर्यातवाढीसाठी दर कमी केल्याने त्याचा मोठा फायदा होणार आहे. केंद्र सरकार ६० लाख रोजगार निर्मिती करणार आहे. आत्मनिर्भर योजनेंतर्गत ६० लाख नोकऱ्या देण्यात येणार आहेत. रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात येतील. देशाच्या सीमा रक्षणासाठी संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्यात येणार आहे. संरक्षणासाठी एकूण ५ लाख २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शस्त्रास्त्रांच्या बाबतीत परकीय अवलंबन कमी करण्यासाठी व देशी संरक्षण उद्योगांना चालना देण्यासाठी अनेक महत्त्वाच्या तरतुदी या अंदाजपत्रकात आहेत. संशोधन कार्यासाठी १२ हजार कोटी रुपयांचा भरीव निधी देण्यात येणार आहे. एकूणच, अंदाजपत्रक गरीब, सर्वसामान्य, उद्योग, शेतकरी यांच्या हिताचे आहे. रोजगारनिर्मितीचा नियमित आढावा घेणे जरुरीचे आहे. कारण आज अनेक युवक नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. गेली दोन वर्षे सर्वच जग कोरोनाशी झुंज देत आहे. त्यामुळे अनेक अडचणी आहेत. त्या पार्श्वभूमीवर हे अंदाजपत्रक सर्वसमावेशक असेच म्हणता येईल.

- शांताराम वाघ, पुणे

### 'शाळा तिथे केंद्र' हा निर्णय चांगला

शासनाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा येत्या मार्चमध्ये ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याकरिता शिक्षण मंडळाच्या प्रचलित पद्धतीत काही बदल करणार आहेत.

विद्यार्थी ज्या शाळेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक आहे, त्याच ठिकाणी त्यांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी अभ्यासक्रम कमी करणे, लेखी परीक्षेचा कालावधीत वाढ करणे इत्यादी उपाययोजना शिक्षण मंडळाने शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करण्याचे ठरवले आहे. कोविड प्रादुर्भावामुळे शिक्षणजगताचे खूप नुकसान झाले आहे, तरी परीक्षा गरजेचे असल्यामुळेच शासनाने नवे धोरण अवलंबून शाळा तिथे परीक्षा केंद्र हा घेतलेला आताचा निर्णय खूप चांगला आहे.

- नीलम सुरेश पाटील, मुंबई

# पोलादपूर : पर्यटनस्थळांसाठी निधी मंजूर

## पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांची माहिती

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील विविध पर्यटन स्थळांच्या विकासकामासाठी पर्यटन विभागातर्फे तब्बल दहा कोटी रूपयांचा विकासनिधी आगामी काळात खर्च होणार असून, यामध्ये घागरकोंडचा झुलतापूल, साखर येथील नरवीर सुर्याजी मालुसरे समाधी आणि उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभिकरण यांचा समावेश असून ब्रिटिशकालीन हिलस्टेशन उल्लेख असलेल्या कुडपणसाठी लवकरच अधिकृत दौरा करून विशेष भरीव निधीची तरतूद करण्यात येईल, अशी माहिती राज्याच्या पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री अदिती तटकरे यांनी दिली.



पोलादपूर तालुक्यातील उमरठ या गावातील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाच्या सुशोभिकरणाच्या कामाचे लोकार्पण राज्यातील महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आल्यानंतरही उमरठच्या विकासासाठी आतापर्यंत पर्यटन विकासासाठी पाच कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली असून, पोलादपूर तालुक्यातील नरवीर सूर्याजी मालुसरे स्मृतीस्थळ विकासित करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिकांकडून मागणी होत असल्याने या कामासाठी २ कोटी २२ लाख तसेच २२ जुलै २०२१ रोजीच्या अतिवृष्टीमुळे पोलादपूरच्या वर्षापर्यटनाचे खास आकर्षण असलेल्या घागरकोंड येथील झुलत्या पुलासाठी २ कोटी ७९ लाख रूपयांचा निधी प्रादेशिक पर्यटनासाठी उपलब्ध करण्यात आला आहे, असे यावेळी अदिती तटकरे यांनी सांगितले.

पर्यटन दिनानिमित्त यासंदर्भात अधिकृत निर्णय महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून घेतल्यानंतर पोलादपूर तालुक्यासाठी उमरठ, साखर आणि घागरकोंड बोरावळेप्रमाणेच कुडपण येथे हिलस्टेशन तसेच महावीरचक्रप्राप्त कृष्णा सोनावणे यांच्या वीरश्रीपूर्ण इतिहासाची साक्ष देणारे पर्यटनस्थळ विकसित करण्यात येणार असून, यासंदर्भात राज्याच्या अदिती तटकरे यांनी स्वत: कुडपण परिसराचा पाहणी दौरा करून राज्य सरकारकडून निधीची तरतूद करण्यासंदर्भात पाठपुरावा करणार असल्याची माहिती दिली.

## महत्त्वाचे

### दामत गावात दोन गटात हाणामारी

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील दामत गावात झालेल्या मारहाण प्रकरणात परस्पराविरोधात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नेरळ दामत गावात १ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास, अल्ताफ जिकरिया नजे हे आपल्या कारमधून कामानिमित्त घराबाहेर निघाले होते. दरम्यान, गावातील राहणारे जाबिर अनिस नजे, रफिक नजे, जलील नजे यांसह आठ जणांनी अल्ताप यांची गाडी अडवून गाडीचे नुकसान करत त्यांना बाहेर काढून मारहाण केली होती. या घटनेबाबत नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, याआधी घरात घुसून मारहाण करण्यात आल्याची तक्रार आता विरोधी गटाकडून म्हणजेच जलील अनिस नजे यांच्याकडून नेरळ पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

# तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रिक्षाचालकांची मोफत तपासणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**



नवी मुंबईत आरोग्य क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटरतर्फे दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत रिक्षाचालकांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात तोंडाच्या कर्करोगाची तपासणी, डायबिटीस, उच्च रक्तदाब तसेच दातांची तपासणी करण्यात येणार आहे. रिक्षाचालकांमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे वाढते व्यसन लक्षात घेता तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटरतर्फे जागतिक कर्करोग दिनानिमित्त हे खास मोफत शिबीर आयोजित केले आहे. नवी मुंबई महानगर पालिका तसेच पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील पुरुष व महिला रिक्षाचालक या शिबिरात सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी रिक्षाचालक ९५९४९१०४७१ या क्रमांकावर संपर्क करून नाव नोंदणी करू शकतात.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा गजाआड

## पनवेल तालुका पोलिसांची कामगिरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करत, तिला लपवून ठेवून गुवाहाटी आसाम येथे पळवून नेण्याच्या तयारीत असलेल्या इसमाला पनवेल तालुका पोलिसांच्या सतर्कतेमुळे गजाआड करण्यास यश आले आहे. पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत ही कामगिरी पार पाडली आहे.

तालुक्यातील हावरे बिल्डिंग, पडघे, पनवेल, येथून कोणीतरी अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलीला फूस लावून अपहरण केले असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक संजय गळवे, पोलीस उपनिरीक्षक भरत पाटील, पोलीस हवालदार महेश धुमाळ, पोलीस हवालदार सुनिल कुदळे, पोलीस नाईक पंकज चंदीले, पोलीस नाईक प्रकाश मेहेर, महिला पोलीस नाईक आरती लाड यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणताही धागादोरा नसताना कौशल्याने तपास करण्यास सुरवात केली.

अपहृत मुलीचे मोबाईलचे सीडीआर प्राप्त करण्यात आले व अवलोकन केले असता एक इसम अपहृत मुलीस सतत कॉल करीत असल्याचे निर्दशनास आले. दरम्यान, संशयित आरोपी संजीप बरदोलोई याचे सीडीआर प्राप्त झाल्यानंतर संशियत आरोपी संजिप बरदोलोई व अपहरीत मुलगी यांचे सीडीआर एकत्रित करून तांत्रिक तपास केला असता त्यामध्ये एक कॉमन कॉलर गुन्ह्याचे दिवशी दोघांच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. या इसमास प्रथम ताब्यात घेऊन अधिक तपास करता त्याने गुवाहाटी, आसाम येथे राहणारा सजीप बरदोलोई (२२) याने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तीस तोंडरे, तळोजा, पनवेल येथे लपवून ठेवले आहे व नंतर ते गुवाहाटी, आसाम येथे जाणार आहेत असे सांगितले. तपासाअंती मुलीला पालकांच्या हवाली देण्यात आले आहे.

# संजीवनी क्लिनीकचे उद्‌घाटन




**। पेण । वार्ताहर ।**

पेण सार्वजनिक विद्या मंदिरचे निवृत्त शिक्षक तथा ॲड. डी.आर. मोकल यांचे चिरंजीव डॉ. अशुतोष मोकल व सून डॉ. तेजस्विनी मोकल या उभयतांनी पेण म्हाडा वसाहतीमध्ये संजीवनी क्लिनीक नव्याने सुरू केले असून, त्याचे उद्‌घाटन गुरुवारी करण्यात आले.

कोव्हिड काळात केलेल्या सेवेबद्दल डॉ. अशुतोष यांचे आरोग्यमंत्री राजेश टोपे, जिल्हाधिकारी रायगड, तहसील पेण तसेच ग्रामपंचायत कोप्रोली यांच्याकडून कोव्हिड योद्धा म्हणून सन्मान केला आहे. तर, डॉ. तेजस्विनी मोकल यांचे जिल्हाधिकारी रत्नागिरी, तालुका आरोग्य अधिकारी चिपळूण यांच्याकडून कोव्हिड काळात केलेल्या सेवेबद्दल सन्मान केलेला आहे.

संजीवनी क्लिनीकच्या माध्यमातून सर्व सामान्यांची सेवा करता यावी म्हणून पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते व महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पी.डी. पाटील यांच्या उपस्थितीत क्लिनीकचे उद्‌घाटन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी सार्वजनिक विद्या मंदिरचे प्रा. एम.एन. पाटील, माजी बांधकाम सभापती रवींद्र जाधव, डॉ. सचिन नाईक, ॲड. प्रमोद कांबळे, ॲड. डी.आर. मोकल, विजया मोकल, एल.ए. पाटील, राजा पाटील आदी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे फुफादेवी पाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६/२ मध्ये स्थित असणारा ग्रामपंचायत सारळ कडील घर क्र.१०९९ क, हा वाणिज्य गाळा श्री.नवनाथ दशरथ शिंदे, रा.फुफादेवी पाडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीचा असून सदरील वाणिज्य गाळा सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी सदर वाणिज्य गाळ्याचे विद्यमान मालक व माझ्या अशिला दरम्यान पुर्ण झाली आहे.

संदर्भित वाणिज्य गाळा पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर वाणिज्य गाळ्याच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित वाणिज्य गाळ्यामध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर वाणिज्य गाळ्याचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील, व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक: ०४/०२/२०२२

सही/-
**(संजय म.भगत)**
'हिराबाग सोसायटी,
अे विंग,टिळक रोड,
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री.रोहिदास हरिश्चंद्र माळी, श्री.भानुदास हरिश्चंद्र माळी व सौ.वनिता वसंत मुने यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे: गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील**

| स.नं./हि.नं | एकूण क्षेत्र(हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| ५४/१/अ | ०-२८-४० | १-३६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक: ०५/०२/२०२२
मोबा ९८२२६९११०९

**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
अमराई रोड, कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे भालिवडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक हरिश्चंद्र रामचंद्र गंगावणे वैगेरे १५ यांचेकडून विकत घेणेचे विचारात आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ४९ | २ | १-८३-३० पैकी विकत देणार यांचे मालकीच्या १-३९-३० पैकी ०-४०-०० | १६-५६ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०२/२०२२

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड-४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकतः-

**मौजे चाणजे ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नाव | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ३४०/३ | श्री.जयप्रकाश परशुराम म्हात्रे | ०.१९.० | ४.८१ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कांत व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांनी सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही, कुळवहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण-उरण
दिनांक: ०५/०२/२०२२

सही/-
**ॲड.उमेश लक्ष्मण शिंदे**
मो.९८२०६२६९००
ऑफिस पत्ता- शॉप नं.९०५-९०८,
शेल्टॉन क्युंबीक्स,प्लॉट नं-८७, सेक्टर १५,
सी.बी.डी.बेलापूर नवी मुंबई-४००६१४,
ऑफिस फोन नं.०२२४९७०९७८९

## जाहीर नोटीस

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांचे वतीने खाली नमूद मिळकतीला (यापुढे मालमत्ता म्हणून संबोधण्यात येते) खाली दिलेल्या पारिशिष्ठमध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या मालमत्तेबद्दल श्री.मकरंद सुरेश नार्वेकर यांच्या मालकी हक्काची चौकशी करीत आहोत.

विक्री, देवाणघेवाण, भाडेपट्टा, भाडेकरू, परवाना ट्रस्ट, धारणाधिकार, देखभाल या मार्गाने या मालमत्तेच्या विरूध्द/बाबतीत/संबंधात कोणतेही अधिकार शीर्षक, व्याज, दावा. मागणी, वहिवाट, कुळ आणि/किंवा आक्षेप असलेली संस्था किंवा कोणतीही व्यक्ती,सुलभता, वारसा, ताबा, तारण, जप्ती, गहाण, शुल्क, भेट, लिस-पेंडन्स, एफएसआय वापर किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारचा आणि कोणत्याही प्रकारे आपेक्ष असल्यास अशा हक्क, शीर्षक, व्याज, दावा, मागणी आणि/किंवा हरकतींच्या समर्थनार्थ १४ (चौदा) दिवसांच्या आत कायदेशीर कागदपत्रांच्या प्रमाणित खऱ्या प्रतींसह झुंजारराव ॲड कंपनी, अधिवक्ता आणि सॉलिसिटर यांना पुढे नमूद पत्त्यावर लेखी नोटीस/माहिती देण्याची विनंती केली जाते.(४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१), नमूद मुदतीत कोणतीही हरकत/दावा प्राप्त झाला नाही तर. असा कोणताही दावा, मागणी किंवा आपेक्ष अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि जरी असा कोणताही दावा, मागणी किंवा आपेक्ष कायद्यात किंवा अन्य कोणत्याही प्रकारे अस्तित्वात असला तरीही दावेदाराने असा दावा सोडला आहे असे मानले जाईल. आणि यानंतर येणारा दावा. मागणी किंवा आपेक्ष घेण्याचा कोणताही अधिकार वा दावा किंवा आपेक्ष आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**पारिशिष्ठ**

मौजे झिराडपाडा तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील स्थित गट क्र.१२१,१२२, १२३, १२४, १२५,१३८,१३९, १४१,१४५/१ आणि १४५/२ यांचे एकत्रिकरणद्वारे बनलेला मोठा गट क्र.१२१/१ मोजमाप ३-६८-८० हे.आर. चा भाग असलेला अंतर्गत प्लॉट क्र.१ क्षेत्र ००.५६.०५ हे.आर.जो पूर्वी गट क्र.१२२, १४१, १४५/१ आणि १४५/२ चा भाग होता. तसेच मौजे झिराडपाडा तालुका अलिबाग गट क्र.१५३ क्षेत्र ००.०४.०० हे.आर.

दिनांक: ०४/०२/२०२२

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**ॲड.विक्रांत झुंजारराव**

## शुध्दीपत्रक क्र.१

**(ई-निविदा सूचना क्र.२४ सन २०२१-२२)**

**संदर्भ-या कार्यालयाची ई-निविदा जा.क्र.अवि/लेशा/निविदा/१२/२०२२ दिनांक ०४/०१/२०२२**

**संदर्भिय ई-निविदा सुचनेतील काम क्र.१ करीता**

| पुर्वीचा कालावधी | सुधारीत कालावधी |
|---|---|
| १)ई-निविदा डाऊनलोड करण्याचा अंतिम दिनांक ०५/०२/२०२२ (सं.६.०० वा.पर्यंत) | ई-निविदा डाऊनलोड करण्याचा अंतिम दिनांक ०७/०२/२०२२ (सं.६.०० वा.पर्यंत) |
| २) ई-निविदा उघडणेः- दिनांक ०९/०२/२०२२ (शक्य झाल्यास) | ई-निविदा उघडणेः- दिनांक ११/०२/२०२२ (शक्य झाल्यास) |

**संदर्भित ई-निविदा सुचनेतील काम क्र.२ व ३ करीता**

| पुर्वीचा कालावधी | सुधारीत कालावधी |
|---|---|
| १)ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि.१२/०१/२०२२ (स.१०.०० वा) ते दि.०५/०२/२०२२(संध्या.६.०० वा) | ई-निविदा उपलब्ध कालावधी:-दि.०५/०२/२०२२ दि.०५/०२/२०२२ (संध्या ०६.०१ वा. ते दि.०१/०३/२०२२ (संध्या ६.०० वा) |
| २) मा.मुख्य अभियंता, सां.बा.प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक १८/०१/२०२२ रोजी दु.३.०० वा. | मा.मुख्य अभियंता, सा.बां, प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालानात दिनांक २२/०२/२०२२ रोजी दु.३.०० वा. |
| ३) ई-निविदा उघडणे :- दिनांक ०९/०२/२०२२ (शक्य झाल्यास) | ई-निविदा उघडणे :- दिनांक ०४/०३/२०२२ (शक्य झाल्यास) |

निविदेतील इतर बदल महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावे ही विनंती.

**जा.क्र.अवि/लेशा/निविदा/६४९/२०२२**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां.विभाग, अलिबाग, जि. रायगड**
**दिनांक:- ०३/०२/२०२२**

सही/-
**(ज.ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता**
**अलिबाग (सा.बां.) विभाग,**
**जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिकेचे विद्यमान मालक सौ.सलोनी परेश अडूरकर व परेश सुरेश अडुरकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे अलिबाग येथील नगरपरिषद अलिबाग हद्दीतील ॲकॉन्स क्लासिक या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१०६ क्षेत्र २७९चौ.फूट (कारपेट) आणि ३९१ चौ.फुट बिल्टअप हि मिळकत.**

सदर निवासी सदनिका निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील निवासी सदनिकामध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचा लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०४/०२/२०२२

सही/-
**ॲड.सौ.कांचन प्र.नार्वेकर**
अलिबाग, जि.रायगड

अर्जदाराचे वकील : ॲड सौ.संजिवनी संयज घुमरे

प्रो.जमा.

## जाहीर नोटीस

नि.नं.-८/ड
दिवाणी संकीर्ण अर्ज १८/२०२२
ने.ता.२१/०३/२०२२

**कर्जत येथील मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

सौ.ऋचा राजीव दाबके — अर्जदार
पुर्वाश्रमीची अपर्णा वसंत करमरकर

विरूध्द

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१.अर्जदार ह्या कै.वसंत वासुदेव करमरकर व कै.वासंती वसंत करमरकर यांची मुलगी आहे. कै.वासंती वसंत करमरकर या दिनांक ०८/१२/२०१४ रोजी अल्पशा आजाराने कर्जत येथे मयत झालेल्या आहेत. तसेच कै.वसंत वासुदेव करमरकर हे दिनांक ०३/०६/२०२० रोजी अर्जदार यांचेकडे ७८९७ बीग क्रिक ड्राईव्ह, कोलंबस, जॉर्जिया ३१९०४, युएसएए येथे अल्पशा आजाराने मयत झालेले आहेत.

२.कै.वसंत वासुदेव करमरकर व कै.वासंती वसंत करमरकर यांची अर्जदार ह्या एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३.महाराष्ट्र शासनाने जून २०१५ च्या सुमारास जी.आर.काढून वारस म्हणून नावे नमूद करण्याकरीता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला असणे आवश्यक आहे असे ठरविले आहे.

४.सदरील अर्जदार हेच कै.वसंत वासुदेव करमरकर व कै.वासंती वसंत करमरकर यांचे वारस आहेत. तसे नाममात्र घोषित (फॉर्मल डिक्लेरेशन) करून मिळण्याकरीता अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणीचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेऊन योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.०४ फेब्रुवारी २०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

कर्जत
को.दा.दि.०१ फेब्रुवारी २०२२

सही/-
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कर्जत**

**कोर्टाचा शिक्का**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कर्जत**

आठवण



शरद कोरडे

# सी रामचंद्र
## मधाळ सुरावटींचा संगीतकार



**मराठी, तेलगु, तामिळ, हिंदी या चारही भाषेतील चित्रपटांना संगीत देणारे मराठी संगीतकार रामचंद्र नरहर चितळकर उर्फ अण्णा चितळकर अर्थात सी. रामचंद्र यांनी एकूण .... चित्रपटांना संगीत दिले. तीन हिंदी व दोन मराठी चित्रपटांची निर्मिती केली. १९५१ सालचा 'अलबेला' व १९५३ सालचा 'अनारकली' या चित्रपटांनी तर सी. रामचंद्र यांच्या कर्तृत्वाचा व लोकप्रियतेचा आलेख अत्युच्च स्थानावर नेऊन ठेवला. १२ जानेवारीला त्यांचा जन्मदिन होता. त्यानिमत्ताने यांच्या कार्याचा आढावा.**

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पुणतांबे गावात सी. रामचंद्र यांचा एका ब्राह्मण कुटुंबात जन्म झाला. त्याचे वडील नरहर चितळकर हे रेल्वेमध्ये स्टेशनमास्तर या पदावर होते. अनेक वर्षे ते मध्यप्रदेशात डोंगरगड या स्थानकात होते. तेथे गोंडिणी आदिवासींची लोकनृत्ये व लोकगीते ते मनापासून ऐकत व ती गाणी ते गुणगुणत बसत. छोटा रामचंद्रही ती गाणी ऐकत असे. काही काळाने वडिलांची बदली नागपूरला झाल्यावर त्यांनी आपल्या मुलाला शाळेसोबतच तेथील शंकरबुवा सप्रे यांच्याकडे संगीत शिक्षणासाठी पाठविले. तेथील गंधर्व महाविद्यालयातही त्यांनी संगीताचे धडे घेतले. तेथे सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक वसंतराव देशपांडे त्यांचे सहाय्यायी होते. संगीतासोबत सी. रामचंद्र यांना अभिनयाचीही आवड होती. चित्रपटात काम करण्यासाठी त्यांनी मुंबईचा रस्ता धरला.



मुंबईत आल्यावर दाक्षिणात्य निर्माते वाय.व्ही. राव यांच्या 'नागानंद' नावाच्या चित्रपटात त्यांना प्रमुख भूमिका करायला मिळाली. हा चित्रपट अयशस्वी झाल्याने त्यांनी मिनर्व्हा मूव्हीटोनच्या 'सैद-ए-हवस' १९३६, व 'आत्मतरंग' १९३७ या चित्रपटातून लहान कामे केली. पण अभिनयात काही जमेल असे त्यांना वाटेना, म्हणून त्यांनी पुन्हा संगीताकडे मोर्चा वळविला. मिनर्व्हाचे संगीतकार बंदेखान होते. त्यांना हबीबखान सहाय्यक होते. त्यांनी रामचंद्र यांनाही संगीत सहाय्यक म्हणून ठेवून घेतले. रामचंद्र यांना हार्मोनियम चांगली बजावता येत असे. शिवाय शास्त्रीय संगीताचे नोटेशनही त्यांना लिहिता येत होते. त्यांचे हे कौशल्य पाहून मिनर्व्हा मूव्हीटोनचे मालक सोहराब मोदी यांनी त्यांना बंदेखान यांच्यासह संगीताची जबाबदारी देण्याचे ठरविले. आण्णा बंदेखानांचेही लाडके होते. त्यांची चाल ऐकताच आण्णा त्याची स्वरलिपी लिहून घेत होते. बंदेखानांसह अण्णा अनेकवेळा मद्रासलाही त्यांच्यासोबत दाक्षिणात्य सिनेमांना संगीत देण्यासाठी जात असत. तेथे त्यांची भेट मा. भगवान पालव यांच्याशी झाली. दोघेही अल्पावधीतच मित्र झाले. मा. भगवान त्यावेळी देमार चित्रपटाचे नायक होते व चित्रपटाचे दिग्दर्शनही ते करीत असत. त्यांचे खूप चित्रपट यशस्वी झाले होते. त्यायोगे त्यांचे निर्मातेही गडगंज झाले होते. त्यावेळी भगवान यांना एक तामिळी चित्रपट दिग्दर्शनाखाली मिळाला होता. त्यांनी अण्णांना या चित्रपटाचे संगीत स्वतंत्ररित्या तयार करण्यास सांगितले. 'वनमोहिनी' या पहिल्या चित्रपटासाठी 'अण्णा चितळकर' या नावाने १९४१ मध्ये संगीत दिले. त्यानंतर इतर काही तामिळ चित्रपटांना अण्णांनी संगीत दिले. मा. भगवान यांनी अण्णांची ओळख द्वारका खोसला या निर्मात्याशी करुन दिली. ते त्यावेळी 'सुखी जीवन' हा चित्रपट तयार करीत होते. त्यांनी 'सुखीजीवन' च्या संगीताची जबाबदारी अण्णांवर सोपविली. १९४२ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला. खोसला यांनी अण्णांना जयंत देसाईंकडे नेले. ते 'सम्राट चंद्रगुप्त' नावाचा चित्रपट तयार करीत होते. त्यांनी अण्णांकडे आपल्या चित्रपटाची जबाबदारी सोपविली. 'अण्णा चितळकर' हे नाव बदलून त्यांनी जाहिरातीमध्ये संगीतकार 'सी. रामचंद्र' असे नाव दिले व अण्णा चितळकरांचे सी. रामचंद्र झाले. याचवर्षी अशोककुमार व शशीधर मुखर्जी हे 'बॉम्बे टॉकीज'मधून बाहेर पडले व त्यांनी 'फिल्मीस्तान' ही चित्रसंस्था स्थापन केली. या नवीन संस्थेतर्फे १९४७ साली 'शहनाई' या नवीन चित्रपटाची घोषणा करण्यात आली. पी.एल. संतोषी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते. गुलाल हैदर हे या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन करणार होते. या चित्रपटांत नासीरखान दुलारी, मुमताज शांती, कुमकुम व किशोरकुमार काम करणार होते. चित्रपटाचे चित्रीकरण सुरु झाले पण लाहोरला गेलेले गुलाम हैदर परत आलेच नाहीत, त्यामुळे शेवटी सी. रामचंद्र यांना फिल्मीस्तानमध्ये सन्मानाने बोलावण्यात आले व शहनाईचे संगीतात त्यांनी चार चांद लावले. हलकी फुलकी व ओठांवर रेंगाळणारी, पाश्चिमात्य संगीताच्या तालावर त्यांनी शहनाईची गाणी लोकप्रिय केली. या चित्रपटामुळे सी. रामचंद्र यांचे नाव हिंदी चित्रपटसृष्टीत गाजले. या चित्रपटांतील 'जवानीकी रेलचली जाय रे' हे गाणे लता मंगेशकर व सी. रामचंद्र यांनी प्रथमच एकत्र गायले. 'आना मेरी जान संडे के संडे' हे गाणेही खूप लोकप्रिय झाले. त्याचवर्षी सी. रामचंद्र यांनी 'अहिंसा', 'पतंगा', 'बच्चोंका खेळ'या चित्रपटांना संगीत दिले. त्यानंतर 'दोस्ती' १९४६, 'दुनिया' १९४९, 'निराला' १९५० 'शिनशिनाकी बुबलावू' १९५२, 'पहिली झलक' १९५४ आदी चित्रपटांना सी. रामचंद्र यांनी संगीत दिले.



दाक्षिणात्य निर्माते एस.एस. वासन यांचा महत्त्वाकांक्षी चित्रपट 'पैगाम' याला संगीत देण्याची संधी सी. रामचंद्र यांना मिळाली. या चित्रपटांत दिलीपकुमार, राजकुमार, वैजयंतीमाला, मोतीलाल, बी. सरोजादेवी, जॉनी वॉकर व पंढरीबाई अशा नामवंत कलाकारांचा संच होता. 'पैगाम' मधील सर्वच गाणी तुफान गाजली. या चित्रपटाचे टायटल साँग 'इन्सानका इन्सानसे हो भाईचारा यही पैगाम हमारा' हे मन्ना डे व सी. रामचंद्र यांनी गायिलेले गाणे खूप लोकप्रिय झाले होते.

सी. रामचंद्र यांनी आपले मित्र मा. भगवान यांना तुम्हीच एका चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शन करा, त्या चित्रपटाला मी संगीत देईन. त्या चित्रपटात आपण धमाल करु या! अण्णांचा हा सल्ला भगवान यांनी मनावर घेतला व 'अलबेला' ची कथा-पटकथा तयार करण्यात आली. राजेंद्रकृष्ण यांनी या चित्रपटासाठी गाणी लिहिली व चमत्कार झाला. चित्रपट प्रचंड यशस्वी झाला. या चित्रपटांतील सर्व गाणी गाजली. या चित्रपटातील अकरा गाण्यांपैकी नऊ गाण्यात लता मंगेशकर यांचा स्वर होता. सी. रामचंद्र यांनीही लतासोबत गाणी गाईली. महंमद रफी यांनी 'दिवाना आयेगा' हे गाणे लतासोबत गायिले. 'धीरेसे आजा रे अश्वियने मे निंदिया' ही लोरी खूप लोकप्रिय झाली. उडत्या चालींची नृत्यगीते प्रेक्षकांनी उचलून धरली. मा. भगवान व गीता बाली यांच्या नृत्याने सिनेशौकीन खूष झाले. 'अलबेला'ने १९५१ साली भारतभर धमाल उडवून दिली.

सी. रामचंद्र यांना आपणही चित्रपट निर्मिती करावी असे वाटू लागले, व त्यांनी १९५२ मध्ये 'न्यू साई प्रॉडक्शन'नावाची संस्था स्थापन करुन प्रथम 'झाँझर' हा चित्रपट निर्माण केला. त्यांतील गाणी गाजली पण चित्रपट आपटला. त्यानंतर त्यांनी 'लहरे' १९५३', 'दुनिया गोल है' १९५५ या आणखी दोन चित्रपटांची निर्मिती केली व आपले हात पोळून घेतले. तीनही चित्रपट अयशस्वी झाले असले तरी त्यांतील गाणी खूप लोकप्रिय झाली, शिवाय याच काळात सी. रामचंद्र यांनी संगीत दिलेला 'अनारकली' हा फिल्मीस्तानचा चित्रपट मात्र तुफान गाजला तो त्यांतील गाण्यांमुळे सराधर मुखर्जींच्या या चित्रपटाचे लेखन नासीर हुसेन यांनी केले होते तर त्यांचे दिग्दर्शन नंदलाल जसवंतलाल यांनी केले होते. प्रदीपकुमार, बीना रॉय, कुलदीप कौर, मुबारक यांनी या चित्रपटांत भूमिका केल्या होत्या. या चित्रपटांतील 'ये जिंदगी उसीकी है', 'मोहोब्बत ऐसी धडकन है', 'जाग दर्दे इश्क जाग', 'आजा अब तो आजा' ही लता मंगेशकर यांनी गाईलेली गाणी खूप लोकप्रिय झाली.

सी. रामचंद्र यांनी दोन मराठी चित्रपटांचीही निर्मिती केली. त्यांत 'धनंजय' । १९६६ व 'घरकुल' १९७० या चित्रपटांचा समावेश होता.

यांतील 'धनंजय' हा रहस्यमय चित्रपट होता तर 'घरकुल' हा कौटुंबिकपर होता. घरकुलमधील पाश्चात संगीतावर आधारीत गाणी खूप लोकप्रिय झाली होती. त्या चित्रपटाचे दिग्दर्शन राजा ठाकूर यांनी केले होते. यातील गाणी गदिमा, सुरेश भट व शांता शेळके यांनी लिहिलेली होती. या चित्रपटाचे चित्रीकरण हैद्राबाद येथील अजंठा स्टुडिओंत प्रामुख्याने केले होते. या चित्रपटांत अरुण सरनाईक, जयश्री गडकर, ओम प्रकाश, नयनतारा, शरद तळवळकर व फैय्याज हे कलावंत होते. यांतील 'पप्पा सांगा कुणाचे?' , 'मलमली तारुण्य माझे', 'कोळ्यात झोपली सत्तार', 'नंबर फिफटी फोर अन्ड हाऊ इज द बांबू डोयर' ही गाणी खूप लोकप्रिय झाली होती, उच्च दर्जाचे निर्मितीमूल्य असलेला हा चित्रपट प्रेक्षकांनी उचलून धरला.

राजकमलच्या व्ही. शांताराम यांनी १९५२ च्या 'परछाईयाँ' या चित्रपटानंतर तब्बल सात वर्षांनी सी. रामचंद्र यांना आपल्या 'नवरंग' या चित्रपटासाठी संगीत देण्यास पुन्हा बोलविले व 'नवरंग'ची सगळी गाणी हीट झाली. या चित्रपटांत सी. रामचंद्र यांनी प्रथमच महेंद्र कपूर यांना हिंदी सिनेमांत गायची संधी दिली व आधा है चंद्रमा रात आधी' या गाण्याने एक उमदा जोड गळ्याचा गायक चित्रपटसृष्टीला दिला.

सी. रामचंद्र यांनी त्यांच्या सिनेकारकीर्दीत एकूण १०६ चित्रपटांना संगीत दिले. त्यांतील १९५६ सालच्या 'आझाद' चा अपवाद सोडला तर त्यांना पुढे कुठल्याही चित्रपटासाठी फिल्मफेअर अवॉर्ड मिळाला नाही. भारत चीन युद्ध समाप्तीनंतर २६ जानेवारी १९६३ रोजी दिल्ली येथील नॅशनल थिएटरमध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या उपस्थितींत हिंदी चित्रपट सृष्टींतील मान्यवर संगीतकार व कलाकार यांच्या मेळाव्यांत झालेल्या कार्यक्रमांत सी. रामचंद्र यांनी कवि प्रदीप लिखीत 'ऐ मेरे वतन के लोगो' हे गाणे लता मंगेशकर यांचेकडून संगीत देऊन गाऊन घेतले व सर्वांना अचंबीत केले. हे गाणे ऐकून पंडितजींच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या व सारा श्रोतवर्ग अचंबीत झाला. या गाण्याने इतिहास घडविला. कवि प्रदीप यांनी या गाण्याच्या रॉयल्टीमधून शहीदांच्या कुटूंबियांना मदत केली.

सन १९७० मध्ये सी. रामचंद्र यांनी 'माझ्या जीवनाची सरगम' हे आपले आत्मचरित्र लिहिले. ते प्रकाशीत झाल्यावर सिनेसृष्टींत एक वादळ निर्माण झाले. सी. रामचंद्र यांनी आपल्या चरित्रांत सिनेसृष्टींतील अनेक प्रकरणांबाबत खुलेआम लिहिलेले होते. आपले कौटुंबिक आयुष्यही त्यांनी नको तितक्या प्रमाणांत उघडे केले होते. या प्रकरणी चित्रपटसृष्टींतील अनेक मान्यवर मंडळी दुखावली गेली. कलावंताचे खाजगी आयुष्य अशाप्रकारे जनतेसमोर आल्याने सिनेसृष्टींत हलकल्लोळ माजला व त्याचा परिणाम बाजारांतून बुक स्टॉलवरील ही सारी पुस्तके गायब झाली. प्रथम खरेदी झालेल्या पुस्तकांखेरीज सर्व पुस्तके नष्ट झाली होती. आज 'सरगम' हे एक दुर्मिळ पुस्तक आहे.

५ जानेवारी १९८२ रोजी वयाच्या ६४ च्या वाढदिवसापूर्वीच त्यांचा मुंबईमध्ये मृत्यू झाला. त्यांनी दिलेली सुमधूर गाणी कुणीही चित्रपट शौकीन विसरु शकणार नाही. ■

---

तारे जमीं पर



अनिता पाध्ये

## आता कशाला उद्याची बात
# शांताबाई हुबळीकर

परंतु काही मिनिटांनी चित्रिकरण सुरु झालं तेव्हा कॅमेरासमोर उभ्या राहिलेया शांताबाईचा धीरगंभीर, साश्रुमय अभिनय बघुन विश्राम बेडेकरांचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना की हीच का ती अभिनेत्री; जी काही मिनिटांपुर्वी हास्यविनोद करत होती? मनोमन त्यांनी शांताबाईंना अभिवादन केलं. ही ताकद होती शांताबाईंच्या अभिनयात. परंतु जीवनात नशीबाची हवी तशी साथ त्यांना कधी लाभली नाही.

१९४२ साली दुसऱ्या मुलाचा जन्म झाल्यावर शांताबाईंनी मोठ्या कौतुकाने त्याचं नाव प्रदीप ठेवलं आणि तेच नाव पुण्यातील आपल्या नव्या भव्य बंगल्याला दिलं. हा बंगला बांधण्यासाठी शांताबाईंना बराच आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. तोपर्यंत त्यांची चित्रपट कारकिर्द सुरु होऊन ८-९ वर्ष झाली होती. अभिनेत्री हिंदी चित्रपटसष्टीतील असो वा मराठी, नायिक म्हणुन तिची कारकिर्द दहा-अकरा वर्षांपेक्षा अधिक चालत नाही.

१९४५ मध्ये प्रदर्शित झालेला 'कुलकलंक' हा नायिका म्हणून शांता हुबळीलरांचा अखेरचा चित्रपट होता. त्यानंतर त्यांना नायिकेच्या भुमिका मिळणे जवळपास बंदच झाल. त्यामुळे १९४५ ते १९५७ या अकरा - बारा वर्षांच्या कालावधीमध्ये चरितार्थ चालवण्यासाठी शांताबाई हैदराबाद, निजामाबाद, दिल्ली, आग्रा, कानपूर, इंदूर, ग्वाल्हेर अशा अनेक शहरांत गाण्याचे जलसे करत होत्या.
साधारणपणे १९५५ च्या सुमाराला त्यांनी 'सौभद्र', 'मानापमान' या मराठी नाटकांतही काम केलं. १९५७ साली प्रदर्शित झालेल्या 'फिल्मिस्तान कंपनी'च्या 'सौभाग्यवती भव' व 'घरगृहस्थी' या एकाच विषयावरील मराठी व हिंदी चित्रपटात शांताबाईंनी चरित्र भुमिका केल्या.मात्र नंतर चरित्र भुमिका सुध्दा मिळेनाशा झाल्या. सातत्याने जलसे, चित्रपट करुनही जमाखर्चाचा मेळ काही बसत नव्हता. शेवटी नवर्याने केलेली कर्ज व देणी फेडण्यासाठी शांताबाईंना स्वत:चा बंगला, मोटारी विकावे लागले. अतिशय आवडीने बांधलेला 'प्रदीप' हा त्यांचा बंगला लिलावामध्ये विकला गेल्याने भाड्याच्या खोलीत राहण्याची त्यांच्यावर वेळ आली.(आजही त्यांचा तो बंगला पुण्यात असुन आता तो 'दीप बंगला' नावाने ओळखला जातो.)

गीतेंशी विवाह केल्यानंतर चित्रपट सोडुन सर्वसामान्य





स्त्रीप्रमाणे संसार करावा , आपल्या म्हणता येतील अशा मायेच्या -हक्काच्या माणसांसह जीवन व्यथित करण्याचं स्वप्न शांताबाईंनी बघितलं होतं. परंतु संसारसुख त्यांना मिळालंच नाही. काही काळाने कामाच्या शोधार्थ पुणे सोडुन त्या मुंबईला आल्या व एका प्रौढ शिक्षण संस्थेमध्ये हिंदी आणि मराठी भाषा शिकवू लागल्या. पुरोगामी विचारांची ही स्वाभिमानी अभिनेत्री आयुष्यातील संघर्षाशी अत्यंत धीराने , संयमाने सामना करत राहिली. परंतु मुलाच्या - प्रदिपचं लग्न झाल्यानंतर परिस्थीती बिकट होत गेली आणो स्वत:च्या्च घरामध्ये शांताबाई परक्या बनल्या. त्यामुळे एक दिवस कुणालाही न सांगता त्या वसईच्या श्रद्धानंद आश्रमात दाखल झाल्या. वध्दाश्रमात प्रवेश करताना 'शांताबाई गिते' हे नाव त्यांनी सांगितलं होतं. चित्रपटसष्टीपासुन दूर गेल्यामुळे 'शांता हुबळीकर' हे नाव जनतेच्या विस्मरणात गेलं होतं. एकेकाळची ही ऐश्वर्यसंपन्न, लोकप्रिय व गुणी अभिनेत्री तब्बल चौदा वर्ष अज्ञातवासाप्रमाणे वध्दाश्रमामध्ये राहिली ही अतिशय दु:खद आणि क्लेशदायक घटना म्हणावी.

१४ वर्षांनी लोकसत्ता वत्तपत्राचे तत्कालिन संपादक माधव गडकरी यांना शांताबाईंच्या अज्ञातवासाविषयी कळलं व त्यांनी लिहिलेल्या लेखामुळे सिनेरसिकांच्या विस्मृतीत गेलेल्या शांताबाई पुन्हा एकदा मराठी जनतेपर्यंत पोहोचल्या. परिणामी राज्य सरकारव्दारे कलाकारांसाठी दिले जाणारे दरमहा निवृत्ति वेतन त्यांना मिळु लागले. १९८९ साली शांताबाईंनी वयाची पंचाहत्तरी पुर्ण केली तेव्हा पुण्यामध्ये त्यांचा सन्मान, सत्कार करण्यात आला. त्यानंतर शांताबाईंनी श्रध्दानंद हा वसईतील वध्दाश्रम सोडुन पुण्याच्या महिला मंडळाच्या आश्रमाचा आसरा घेतला. १७ जुलै १९९२ साली याच आश्रमात अल्पशा आजाराने शांताबाईंचं निधन झालं. निधनापुर्वी त्यांनी 'कशाला उद्याची बात' हे आत्मचरित्र लिहिलं.

कशाला उद्याची बात ?
आपल्या आगामी आयुष्यात काय होणार हे कुणालाच माहिती नसतं. शांताबाईंनी सुध्दा लहानपणी, चित्रपटसष्टीत लोकप्रियता मिळाल्यावर विचार केला नसेल की आपल्या आयुष्याची परिणीती अशी होईल म्हणुन.

---

सहज सुचलं म्हणून...



विलास समेळ

# विमान



दीपा , अलार्म लावलास ना ? ' ओला ' ची टॅक्सी मी पहाटे तीन वाजता बोलावलेय. किचनमधूनच दीपाने म्हटलं, हो , हो. अलार्म लावलाय , तुमची बॅग भरुन ठेवले आणि सकाळी घालायचा ड्रेस सुद्धा काढून ठेवलाय. तुम्ही शांत झोपा आता. मिनू तर केव्हाच झोपली. माझं काम आटपलं की, मी झोपेन. दिलीपने पडत्या फळाची आज्ञा मानून बेडवर अंग टाकलं.

कंपनीच्या कामासाठी त्याला महिना दीड महिन्यातून एकदा तरी हैद्राबादला जायला लागायचं. कंपनीचं हेड ऑफिस जरी हैद्राबाद असलं तरी मुंबई ऑफिसची सर्व जबाबदारी दिलीपवरच होती. गावातल्या शाळेतून शिक्षण घेणा-या दिलीपला गरीबीमुळे इच्छा असूनही उच्च शिक्षण घेता आलं नसलं तरी निरनिराळे कोर्सेस नि डिप्लोमा करत त्याने या कंपनीत नोकरी मिळवली होती. स्वकर्तृत्वावर तो पुढे पुढे जात राहिला. नोकरीत स्थिर झाल्यावर त्याने लग्न केलं आणि दोन वर्षांपूर्वीच मिनूचं आगमन झालं. ख-या अर्थाने तो स्थिरस्थावर झाला असला तरी गाव , गरीबी नि आईबाबांना तो विसरला नव्हता. बरोबर तीन वाजता ' ओला ' ची टॅक्सी आली आणि पहाटे ट्रॅफिक नसल्याने तो थोडा वेळेआधीच एअरपोर्टवर पोहोचला. वेटिंरुममध्ये बसल्या बसल्या त्याला त्याचं बालपण आठवलं. बाबांबरोबर शेतावर जाताना कधीतरी डोक्यावरुन विमान गेलं की , तो बाबांना म्हणायचा ; बाबा , मला अशा विमानातून फिरायला मिळेल काय ? त्यावर ते म्हणायचे , आपण गरीब माणसं. आपलं ते काम नाय. थोरामोठ्यांची कामं ती. आपण नुसतं बघायचं. घराबाहेर खेळताना कधी विमान दिसलं की, तो ताईला ते बघायला बोलवायचा.कागदी विमानं करुन ती उडवण्याचा खेळ तर त्याचा आवडता छंद !

आता तोच दिलीप स्वत:च्या हुशारीने नि देवाच्या कृपेने सहजपणे विमानप्रवास करत असला तरी त्याची एक इच्छा होती की , कधीतरी आईबाबांना विमानात बसवायचं. एकदा त्याने आईबाबांना मुंबईत बोलावलं आणि म्हणाला , आपण सगळे ताईकडे जाऊया. ताईचं सासर पुण्यातच होतं. आईबाबा , दीपा नि मिनूसह सर्व येत असल्याचं त्यानं ताईला कळवलं. कशाने जातोय हे मात्र सांगितलं नाही. त्यादिवशी जेव्हा टॅक्सी एअरपोर्टवर गेली तेव्हा बाबा म्हणाले, अरे एस् टी स्टॅंड , रेल्वे स्टेशन सोडून आपण इकडे कुठे आलो ? त्यावेळी त्याने खरं काय ते सांगितलं. आईबाबा तुम्हाला एकदातरी विमानात बसवायची माझी इच्छा होती. ती आज पूर्ण होतेय. आईबाबांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. लहानपणी विमानात बसायचं त्याचं स्वप्न त्याने पूर्ण तर केलंच पण आईबाबांनाही विमानात बसवून पुत्र कर्तव्यही पार पाडले.

धन्य ते माता पिता आणि धन्य तो त्यांचा सुपुत्र ! ■

८८७९००५८५८

कृषीवल
www.krushival.in
ग्लॅम वर्ल्ड
▶▶ शनिवार, दि. ५ फेब्रुवारी २०२२



# मोठ्या स्टार्सना छोट्या पडद्याची भुरळ



छोटा पडदा प्रत्येकालाच भरभरून देत असतो. बिग बी अमिताभ बच्चनलाही पडत्या काळात या छोट्या पडद्यानेच हात दिला होता. छोट्या पडद्यावरून प्रत्येकाच्या घरात आणि थेट मनात दाखल होता येतं. आवडत्या मालिकेला प्रेक्षक डोक्यावर घेतात. त्यामुळे मराठीतल्या मोठ्या कलाकारांनाही छोट्या पडद्याची भुरळ पडते. 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून



**येत्या काळात अनेक नव्या मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहेत. जुन्या, रटाळ मालिकांच्या जागी ताजं कथानक असणाऱ्या मालिका दाखल होत आहेत. त्यातच मराठीतले मोठे स्टार्स पुन्हा एकदा मालिकांकडे वळत असल्याचं चित्र आहे. प्रार्थना बेहरे, श्रेयस तळपदे, मुक्ता बर्वे, उमेश कामतनंतर आता स्वप्नील जोशी आणि शिल्पा तुळसकर ही जोडी मालिकेतून रसिकांसमोर येते आहे.**

श्रेयस तळपदे आणि प्रार्थना बेहरे हे कलाकार छोट्या पडद्यावर अवतरले. ही मालिका चांगलीच गाजते आहे. तिकडे मुक्ता बर्वे आणि उमेश कामत ही जोडीही 'अजूनही बरसात आहे' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली. अल्लड वयातलं प्रेम कधी संपत नसतं असा संदेश देणारी ही मालिका प्रेक्षकांना भावली. या मालिकेतल्या मीरा आणि आदिराजचं अखेर लग्न झालं आणि आता त्यांचा लग्नानंतरचा प्रवास प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. आता स्वप्नील जोशी आणि शिल्पा तुळसकर ही जोडी 'तू तेव्हा तशी' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेचा प्रोमो चांगलाच चर्चेत आहे. यानिमित्ताने स्वप्नील जोशी आणि शिल्पा तुळसकर ही नवी जोडी प्रेक्षकांना पहायला मिळेल. मालिकेच्या प्रोमोमध्ये हे दोघं मास्क घालून जाताना एकमेकांकडे पाहत आहेत. म्हणजेच त्यांची जुनी ओळख असल्याचं दिसून येत आहे. आता या मालिकेचं कथानक नेमकं काय असणार,याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. ही मालिका म्हणजे अनामिका आणि सौरभ यांची प्रेमकथा असल्याचं स्वप्नील जोशी सांगतो. स्वप्नील जोशी चार वर्षांनी मराठी मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. या मालिकेतून दर्जेदार असं काहीतरी पहायला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होते आहे.

# जादू दाक्षिणात्य चित्रपटांची



**'पुष्पा'च्या प्रवासात अखेर तो क्षण आलाच. या चित्रपटाने हिंदी पट्ट्यात १०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. धीम्या सुरूवातीनंतर 'पुष्पा'ने मोठी भरारी घेतली आणि १०० कोटी क्लबमध्ये प्रवेश केला. तिकडे 'स्पायडर मॅन : नो वे होम'च्या कमाईतही भर पडते आहे तर 'हृदयम' या मल्याळी चित्रपटाला परदेशात चांगला प्रतिसाद मिळतो आहे.**

अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा'ने अखेर १०० कोटी क्लबमध्ये प्रवेश केला. पहिल्या दिवशी ३.३३ कोटी रुपये कमावणाऱ्या या चित्रपटाने सातव्या आठवड्यात हा टप्पा गाठला आहे. याआधी 'बाहुबली : द बिगिनिंग'ने हिंदी पट्ट्यात पहिल्या दिवशी अवघे ५.१५ कोटी रुपये कमवून ११७ कोटी रुपयांचा टप्पा गाठला होता. 'पुष्पा'च्या बाबतीत सांगायचं तर या चित्रपटाने कोरोनाकाळात ही कामगिरी केली आहे. अनेक राज्यांमध्ये चित्रपटगृह बंद असताना किंवा ५० टक्के क्षमतेने सुरू असताना 'पुष्पा'ने १०० कोटी रुपये कमावले आहेत. त्यामुळे 'पुष्पा'चं अधिक कौतुक होत आहे. 'पुष्पा' हिंदी पट्ट्यात सुपरडुपर हिट ठरला आहे. तिकडे 'स्पायडर मॅन : नो वे होम' हा चित्रपटही धुमाकूळ घालतो आहे. डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. बॉक्स ऑफिस मोजोच्या म्हणण्यानुसार, या चित्रपटाने अमेरिकेत ७६०,५०७,६२५ डॉलर्सची कमाई केली आहे. त्यामुळे 'स्पायडर मॅन : नो वे होम' अमेरिकेत सर्वाधिक कमाई करणारा आजवरचा तिसऱ्या क्रमांकाचा चित्रपट ठरला आहे. चित्रपटाला असाच उत्तम प्रतिसाद मिळत राहिला तर तो अमेरिकेत दोन अब्ज डॉलर्सही कमवू शकतो. टॉम हॉलंडलाही या चित्रपटाकडून एवढ्या चांगल्या कामगिरीची अपेक्षा नव्हती. मात्र कोरोनाच्या या काळातही चित्रपटाला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचं दिसून येत आहे. 'स्पायडर मॅन : नो वे होम'ने या प्रवासात अनेक तगड्या चित्रपटांना टक्कर दिली आहे. दरम्यान सध्या सगळीकडे दाक्षिणात्य चित्रपटांची धूम दिसते आहे. 'पुष्पा'च्या जबरदस्त यशानंतर आता 'हृदयम' या मल्याळी चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. 'हृदयम'ला भारतीय समिक्षक तसंच प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर या चित्रपटाने परदेशातही उत्तम कमाई केल्याचं दिसून येत आहे. हा चित्रपट ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये चांगला व्यवसाय करतो आहे. कोरोनाच्या या कठीण काळातही दर्जेदार चित्रपटांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं दिसून येत आहे.





# तारीख पे तारीख

कोरोनाळात अनेक चित्रपटांच्या तारखा पुढे ढकलण्यात आल्या. त्यामुळे बड्या चित्रपटांची बॉक्स ऑफिसवर टक्कर पहायला मिळणार आहे. 'आरआरआर' आणि 'भुलभुलैय्या २' हे दोन चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित होणार होते. मात्र आरआरआरशी टक्कर टाळण्यासाठी 'भुलभुलैय्या २' च्या टीमने प्रदर्शनाची तारीख बदलण्याचा निर्णय घेतला आहे. 'भुलभुलैय्या २' आधी २५ मार्चला प्रदर्शित होणार होता. मात्र आता चित्रपट २० मे या दिवशी प्रदर्शित होणार असल्याचं कळतंय. या दिवशी कोणताही मोठा चित्रपट प्रदर्शित होणार नसल्यामुळे भुलभुलैय्या २ ला त्याचा लाभ होऊ शकतो.

# साराची भटकंती

सारा अली खान सोशल मीडियावर बरीच ॲक्टिव असते. तिचे अनेक फोटो आणि व्हिडिओ विविध साईट्सवर झळकत असतात. साराने नुकतेच भटकंतीचे फोटो शेअर केले आहेत. सारा भाऊ अब्राहम अली खानसोबत काश्मीरमध्ये भटकंतीचा आनंद लुटते आहे. साराने गुलमर्गमध्ये बर्फात खेळतानाचे फोटो शेअर केले आहेत. साराने नुकतंच एका चित्रपटाचं चित्रिकरण पूर्ण केलं असून त्यानंतर ती काश्मीरच्या स्वर्गात निवांतता अनुभवते आहे.




# ह्युमन एक गडद सत्य

गेल्या दोन वर्षात सर्वात जास्त चर्चेत राहिलेले कोणते क्षेत्र असेल तर ते आरोग्यक्षेत्र होय. कोरोनाच्या महामारीशी लढताना सामान्य माणसाच्या मनात असंख्य प्रश्न आरोग्य क्षेत्राविषयी निर्माण होतात व या प्रश्नांची जर उकल झाली नाही, तर अनेकवेळा गूढ वलय निर्माण होते. या गूढ वलयाची दखल घेऊन डिज्नी हॉटस्टारने आरोग्यक्षेत्र तसेच या क्षेत्राशी निगडित असलेल्या फार्मा कंपनी क्षेत्रातील घडामोडीचा वेध घेणारी ह्यूमन हि नवी वेब सिरीज रिलीज केली आहे. या वेब सीरिजचे चित्रण भोपाळ येथे झाले आहे. भोपाळमध्ये १९८४ साली विषारी वायू कांडामुळे हजारो निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला होता व याच मृत्यूची झालर या वेब सिरीजला आहे. या वायू गळतीच्या जखमा घेऊन जगणारी अनेक माणसे या वेब सिरीजमध्ये आहेत. प्रामुख्याने मुख्य भूमिका असलेल्या शेफाली छाया हिचा पूर्वइतिहास या वायूगळतीशी संबंधित आहे. याच घटनेचा आधार घेऊन बाजारात येणाऱ्या नवीन औषधांच्या मेडिकल ट्रायलचे वास्तववादी चित्रण या वेब सिरीजमध्ये पाहायला मिळते. माय नेम इज गब्बर या गाजलेल्या हिंदी चित्रपटात सामान्य माणसाचे वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली कसे शोषण होते याची एक झलक दाखविण्यात आली होती व ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती. या वेब सिरीजनेसुद्धा कुठेतरी हाच प्रेक्षक समोर धरून याची पटकथा लिहिली असल्याचे जाणवते. एका प्रख्यात हॉस्पिटलची मालकीण व तिच्या जग जिंकणाच्या आकांक्षासमोर सामान्य माणसाला काडीची किंमत नाही याची जाणीव आपल्याला प्रत्येक भागात होते. एक प्रस्थापित हॉस्पिटल स्थापन झाल्यावर अजून एक मोठे हॉस्पिटल उभे करण्याचा मानस असलेल्या महिला डॉक्टराची हि एक कथा आहे. या कथेत तिला मदत करणारे राजकारणी आहेत तसेच फार्मा कंपनीचे मालक आहेत व काही पैशासाठी स्वतःवर औषधांची चाचणी करून घेणारे गरीब नागरिक आहेत. भोपाळमध्ये एक फार्मा कंपनी व एक प्रस्थापित हॉस्पिटल यांच्या संगमनमताने मेडिकल कॅम्प भरवून गरीब व निष्पाप नागरिकांच्या शरीरावर बाजारात येणाऱ्या नवीन औषधांची चाचण्या केल्या जातात व या चाचण्यांना सरकारी मान्यता असते. परंतु अनेकवेळा चुकीच्या औषधांमुळे अथवा पैशाच्या लोभापायी शरीरातील जुने आजार लपवल्यामुळे हे नागरिक थेट मृत्यूच्या दारात जातात व हाच या पटकथेचा केंद्रबिंदू आहे. याआधी सुद्धा अनेक वेब सिरीजमधून आपल्या उत्कृष्ट अभिनयाचे प्रदर्शन करणाऱ्या कीर्ती कुल्हारी ही गुणी अभिनेत्री नागरिकांना न्याय देण्याच्या भूमिकेत आल्यामुळे प्रेक्षकांना कुठेतरी हायसे वाटते. या वेब सिरीजमध्ये अजून एक महत्वाचा विषय उत्कृष्टरित्या मांडला गेला आहे तो म्हणजे समलैंगिगता व भिन्नलैंगिकता. मुखत्वे जेव्हा आपले मूल समलैंगिक आहे हे जेव्हा कळते तेव्हा त्या घरामध्ये काय परिस्थिती अथवा माहोल तयार होतो हे या वेब सिरीजमध्ये उत्तमरित्या मांडले आहे.





**उमेश भोगले**

या वेब सिरीजची अजून एक जमेची बाजू म्हणजे एक विभक्त झालेले जोडपे एकत्र काम करताना (पडद्यावर नाही) बघायला मिळाले आहे. या चित्रपटाचे निर्माते विपुल शहा असून, ते आपल्या पत्नीपासून म्हणजेच शेफाली छायापासून खूप वर्षांआधी विभक्त झाले होते. करमणुकीच्या क्षेत्रामध्ये असा दुर्मिळ योग खूपच कमी येतो. या वेब सिरीजची दुबळी बाजू म्हणजे तुम्हाला एक ते दोन भागानंतर पुढे काय होणार याचा अंदाज येतो कदाचित निर्मात्याला याचा दुसरा सीजन बनवायचा नसेल त्यामुळे जे वेब सीरिजचे चाहते आहेत, त्यांच्यासाठी हे वेब सिरीज बघणे खूपच सोपे जाणार आहेत. कारण फारच कमी ट्विस्ट या वेब सिरीजमध्ये आहेत. ह्युमनमधील सर्व कलाकारांची कामे खुच छान झाली आहे, सीमा विश्वास, राम कपूर व संदीप कुलकर्णी यांनी आपली भूमिका फारच चांगल्या प्रकारे वठवली आहे. आपल्या बायकोचे सर्व नखरे-आकांक्षा झेलताना झालेली कुंचबणा आपल्या मुद्राभिनयाने राम कपूरने चांगली वठवली आहे. मर्दानी २ मध्ये मुख्य खलनायकाची भूमिका करणाऱ्या विशाल जेठवा या तरुण कलाकाराला या वेब सिरीजमुळे एक चांगला ब्रेक मिळाला आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे या वेब सिरीजमध्ये काय करीत आहे, हा प्रश्न सुद्धा प्रेक्षकांना पडल्याशिवाय राहत नाही. आरोग्यक्षेत्रामध्ये अनेक प्रयोग होत असतात काही प्रयोग यशस्वी होतात तर काही असफल होतात परंतु आरोग्यक्षेत्रातला हा प्रयोग नक्कीच पाहण्यासारखा आहे.

# उर्वशीचा गोल्डन लूक

उर्वशी रौतेला तिच्या वैविध्यपूर्ण कपड्यांमुळे चर्चेत असते. मध्यंतरी तिने सोनेरी रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या त्या ड्रेसची चांगलीच चर्चा झाली. मध्यंतरी तिने ४० कोटी रुपये किंमतीचा एक ड्रेस घातला होता. सोनं आणि हिऱ्यांनी मढलेल्या या ड्रेसमध्ये उर्वशी खूपच सुंदर दिसते. उर्वशीने हा ड्रेस घालून अरब फॅशन वीकमध्ये रॅम्पवॉकही केला. प्रेक्षकांनाही तिचा हा लूक भावला आहे.





# आलियाची महागडी चप्पल

बॉलिवूड सेलेब्जच्या आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीची चर्चा होते. आता आलिया भट्टचंच बघा. बॉलिवूड तारका महागडे कपडे आणि ॲक्सेसरीज कॅरी करत असतात. आलियानेही मध्यंतरी अशीच महागडी चप्पल घातली होती. तिच्या या चपलेची चर्चा रंगली नसती तरच नवल! सध्या आलियाचे काही फोटो व्हायरल झाले आहेत आणि त्यात तिने घातलेल्या चपलेची किंमत ऐकून कोणीही उडेल. आलियाने एक लाख रुपये किंमतीची चप्पल घातली होती. एवढ्या किंमतीत आपण एक दुचाकी विकत घेऊ शकतो. एवढी महागडी चप्पल घातल्याबद्दल आलिया ट्रोलही होते आहे.



# बॉलिवूडच्या आकाशातली चांदणी

**अनन्या पांडेने २०१९ मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. 'स्टुडंट ऑफ द ईयर २' मधून ती रुपेरी पडद्यावर झळकली. अवघ्या तीन वर्षांमध्ये अनन्याने बॉलिवूडमध्ये स्थान निर्माण केलं आहे. या काळात तिने काही चांगले चित्रपट केले. आता ती 'गहराईयां'मध्ये दिसणार आहे. तसंच संपूर्ण भारतात प्रदर्शित होणारे दाक्षिणात्य चित्रपटही तिच्याकडे आहेत.**

एक स्टारकिड म्हणून बॉलिवूडमध्ये दाखल होणं कदाचित सोपं असावं पण इथे टिकून राहण्यासाठी मेहनत तर करावीच लागते. त्यासोबतच तुमच्या चित्रपटांची निवडही महत्त्वाची ठरते. आजवर अनेक स्टारकिड्स आले आणि गेले. काही मोजके स्टारकिड्स या चमचमत्या दुनियेत पाय रोवून उभे राहू शकले. अनन्या पांडे ही अशाच काही मोजक्या स्टारकिड्सपैकी एक. २०१९ मध्ये चंदेरी दुनियेत पाय ठेवल्यानंतर अनन्याने मागे वळून पाहिलं नाही. तिने मोजकेच चित्रपट केले असले तरी तिची निवड महत्त्वाची मानली जात आहे. अनन्या पांडे नावाची चांदणी बॉलिवूडच्या आाकाशात चमकू लागल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे. सध्या तिचा 'गहराइयां' हा चित्रपट चर्चेत आहे. इतकंच नाही तर काळाची पावलं ओळखत तिने दाक्षिणात्य चित्रपटांकडेही मोर्चा वळवला आहे. 'पुष्पा', 'बाहुबली'सारख्या चित्रपटांच्या यशातून तिने धडा घेतला आहे. संपूर्ण भारतभर प्रदर्शित होणारे दाक्षिणात्य चित्रपट त्यातल्या मसाल्यामुळे चांगलेच हिट ठरतात हे तिने जाणलं आहे. म्हणूनच येत्या काळात ती 'लायगर'मध्ये दिसणार आहे. यात विजय देवराकोंडा तिचा नायक आहे. पुरी जगन्नाथने चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. अनन्याला या चित्रपटात पाहण्यासाठी तिचे चाहते उत्सुक आहेत. 'स्टुडंट ऑफ द ईयर २' मधून पदार्पण केल्यानंतर अनन्याने 'पती, पत्नी और वो' मध्ये काम केलं. या विनोदी चित्रपटातला तिचा अभिनय प्रेक्षकांना भावला. 'खालीपीली'मध्ये तिने मुंबईतल्या बिनधास्त मुलीची भूमिका केली होती. 'खालीपीली' कोरोनाकाळात प्रदर्शित झाला असला तरी अनन्याच्या अभिनयाने सर्वांची मनं जिंकली. आता तिचा 'गहराइयां' चर्चेत आहे. यात ती वेगळ्याच भूमिकेत दिसणार आहे. 'गहराइयां'मधून नातेसंबंधांमधली गुंतागुंत पहायला मिळणार आहे. 'गहराइयां'मधला अनन्याचा अभिनय पाहण्याची उत्सुकता तिच्या चाहत्यांना लागून राहिली आहे.

